**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३७**

**सभावृत्तांत**

दिनांक - २०.११.२०१४ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोव्हेंबर २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.११.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा. †›.संदिप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.जयश्री वसंत गावडे

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.शेख अस्लम शैकत

५२. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५४. मा.वाबळे संजय मल्हारराव

५५. मा.मडिगेरी वर्षा विलास

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५९. मा.मोहिनीताई विलास लांडे

६०. मा.अजित दामोदर गव्हाणे

६१. मा.गोफणे अनुराधा देविदास

६२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६४. मा.श्रद्धा बाजीराव लांडे

६५. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.आसवाणी सविता धनराज

८१. मा.वाघेरे सुनिता राजेश

८२. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.आप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

९४. मा.बारणे माया संतोष

९५. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९८. मा.कलाटे स्वाती मयुर

९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे

११०. मा.जम सोनाली पोपट

१११. मा.प्रशांत शितोळे

११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास

११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११६. मा.शेंडगे आशा सुखदेव

११७. मा.मोटे किरण बाळासाहेब

११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११९. मा.संजय केशवराव काटे

१२०. धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डॉ.डोईफोडे, मा.दंडवते, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.दुधेकर, मा.इंगळे, मा.काची, मा.तांबे, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.घोडे - कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर**-उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) मनपा हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालयांमधील इ. १०वी व १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस रक्कम देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१                    प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.महापालिका सभा क्रमांक - २६ दिनांक २०/२/२०१४, दि.१८/३/२०१४, दि.२५/४/२०१४, दि.९/६/२०१४, दि.५/७/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, रवी चोप्रा-चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक, अतुल अभ्यंकर-नाटक आणि मालिका क्षेत्रातील अभिनेता, सुर्यकांत रामचंद्र पवार-सामाजिक कार्यकर्ते विक्रम पवार यांचे वडील, प्रताप अडसुळ, ऋषिकेश पुजारी-वय वर्षे ५, श्री.निकम-कार्यकारी अभियंता मकरंद निकम यांचे वडील, सदाशिव अमरापुरकर-सिनेअभिनेता, मंगला मोटे, सदाशिव चिंचवडे, सुशिला मानकामे, श्रीमती दगडे-नगरसेविका मा.झामाबाई बारणे यांच्या मातोश्री यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

-----------

**मा.किरण मोटे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आज प्रकर्षाने एका गोष्टीकडे लक्ष वेधायचे आहे. पाणीपुरवठा विभागामार्फत रविवारपासून दोन वेळा पाणीपुरवठा केला आहे आत्तापर्यंत यात एवढ्या त्रुटी व एवढ्या तक्रारी आल्या असतील, निसर्गाने नाहीतर आपल्या पाणीपुरवठा विभागाला एक वेळी पाणी देण्याची वेळ आली आहे. दोन वेळ पाणी पुरवठा करायची या विभागाची क्षमताच नाही असा माझा स्पष्ट आरोप आहे. काही सदस्यांना त्यांच्या प्रभागात दोन वेळ पाणी हवे आहे. मी माझ्या प्रभागातील नागरीकांच्या वतीने बोलतोय. गेले चार दिवसांपासून प्र.क्र.६३ कासारवाडी इथे मी मागणी करतोय. माझ्या भागात गेले दोन/तीन महिन्यांपासून ज्या पद्दतीने पाणीपुरवठा चालू होता, त्याच पद्धतीने पाणीपुरवठा करण्यात यावा. या विभागातील काही गोष्टी निदर्शनास आणून द्यायच्या आहेत. कासारवाडीत नवीन पाण्याची टाकी बांधलेली आहे. गेले पाच वर्षांपासून ही टाकी बांधली आहे. वर्षातील दोन/तीन महिनेच ही टाकी भरली जाते. मुळात टाक्या बांधतात, यात नियोजनशून्य काम झाले आहे. टाकी बांधली असलीतरी ती भरायची सोय आजपर्यंत झालेली नाही. आजपर्यंत वाहिन्या टाकल्या नाहीत. मग कशासाठी या टाक्या बांधायला घेतल्या गेल्या. त्या भागातून वल्लभनगर इथली टाकी पूर्ण क्षमतेने भरली जात नाही. तिथलेच पाणी कासारवाडीत येणार आहे. ज्या टाक्या आहेत त्या पूर्ण भरू शकत नाहीत तर नवीन टाक्या कशासाठी बांधताय हे मला कळत नाही. कासारवाडी क प्रभागात येते आणि पिंपळे गुरव ड प्रभागात येते कासारवाडी महापालिकेच्या हद्दीत आहे, भारतात आहे, पाकिस्तानात तर नाही. कोणाच्या आदेशावरुन मला पाणी दिले जात नाही. याचा खुलासा मला पाहिजे आहे. आपल्या काही विभागांमार्फत चुकीचे काम होते. स्काडा सिस्टीम, मिटर पद्धत हे अक्षरशः ठेकेदाराला पोसण्यासाठी केले आहेत. आपल्याकडे तक्रार आली नसेलतर पाण्याचे मिटर दुरुस्त केले जात नाहीत नागरीकांनी आणायचे व नावाला

बसवायचे. आपल्या क्षेत्रिय कार्यालयातील मीटर निरीक्षकांकडून मीटर दिले जातात. ज्यावेळी हे मीटर रिपेअर करायची वेळ येते, त्यावेळी ते हात वर करतात. आम्ही मीटर दिले नाहीत. ज्या कोणी दिलेत त्यांच्याकडे जाऊन भांडा असे सांगतात. पुणे महापालिका एवढी मोठी महापालिका आहे. त्यांना जेएनएनयूआरएमचे पैसे मिळाले नाहीत. रेड झोन, रेड लाईन, मीटर पद्धत, स्काडा सिस्टीम आपल्या या सगळ्या गोष्टी आपण स्वतःहून लावून घेतल्या आहेत हे सगळे पुणे महापालिकेला का नाही. अनधिकृत नळ कनेक्शन कशासाठी तोडायचे. ते आपलेच पाणी चोरून वापरतात. पाकिस्तानात पाणी नेतात का. जे आपले नागरीक असतील त्यांना पाणी द्या. आपण बाकी गोष्टीवर इतका खर्च करतो. पाणी मिटर पद्धत, स्काडा सिस्टीम यापेक्षा मुलभूत गोष्टींसाठी पाणीपुरवठ्यावर खर्च करावा लागणार आहे. पाणी उपसा यंत्रणा, पाणी वाहून नेण्याची यंत्रणा यावर भरीव खर्च करा. बाकी गोष्टी कशासाठी पाहीजेत. पाणी देऊ शकत नसाल तर काम कशासाठी करतात. मला माझ्या प्रभागात उद्यापासून एक वेळ पाणीपुरवठा पाहिजे आहे.

**मा.धनंजय आल्हाट**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, ज्या वेळेपासून दोन वेळ पाणीपुरवठा सुरु झाला, चिखली, मोशी या ग्रामिण भागात पाण्याच्या तक्रारी सुरु झाल्या आहेत. पाणी एक वेळ चालू केले होते त्यावेळी पाण्याच्या तक्रारी थांबल्या होत्या. आता नव्याने पाण्याच्या तक्रारी चालू झाल्या आहेत. याचा अर्थ असाच आहे, शहराला पाणीपुरवठा करणारी जी व्यवस्था आहे, येणारे पाणी, जाणारे पाणी यात फार मोठी तफावत आहे. आपली शहराला एक वेळ पाणी देण्याची क्षमता आहे. आयुक्त व संबंधित अधिका-यांनी चुकीचा निर्णय घेतला असेल तर तपासून पहा. पाऊस कमी झाला आहे. भिषण संकटाला सामोरे जावे लागेल. मतदारांना खूष करण्यासाठी चुकीच्या घोषणा करायची व लोकांची खोटी सहानुभूती मिळवायची याच्या भिषणतेचा विचार करा. आपल्याला भविष्यात या प्रसंगाला सामोरे जावे लागणार आहे. ग्रामिण समाविष्ट भागात हेच करा. लोक भरतीत अशा पद्धतीने करात फरक नसेल, सुधारीत नसेल सुविधा देऊन कसा फरक देतो. इथे दोन वेळेला पाणी देता. समाविष्ट गावांत एक वेळ देखील पाणी येत नाही. असा फार मोठा भेदभाव का करताय. आयुक्त साहेब, समाविष्ट गावांतील लोकांना नागरी सुविधा नाहीत. या लोकांनी किती दिवस अन्याय सहन करायचा. या लोकांना न्याय द्या. शहरातील लोकांना एक वेळ पाणी करा. जेणेकरुन लोकांना व्यवस्थित पाणी मिळेल अशी सूचना करतोय. सूचना घेतली नाहीतर महापालिकेवर समाविष्ट गावातील नागरीकांना एकत्र करुन प्रचंड मोर्चा काढू याची दखल घ्यावी.

**मा.अश्विनी चिंचवडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड शहरामध्ये गेले दोन तीन दिवसांपासून दोन वेळेला पाणीपुरवठा करण्यात आला आहे. परंतू पाणी पुरेसे, नियमित व वेळेवर येत नाही. तसेच प्रेशर कमी असल्यामुळे चिंचवड, केशवनगर भागात गढूळ पाणी येते आहे. बहुसंख्या महिलांना मनस्ताप होतो आहे. ज्या नोकरदार महिला आहेत, त्या तर अक्षरशः रडकुंडीला आल्या आहेत. जबाबदार अधिकारी यांना संपर्क केला असता त्यांनी उत्तर दिले होते, दोन/तीन दिवसांत नियोजन करतो. जमिनीखाली टाक्या योग्य संपाच्या नाहीत. लोकसंख्या वाढली आहे. जुने नळ जोड नागरीकांनी बदलून घ्यावेत अशी

बेजबाबदारपणे उत्तरे अधिकारी देत आहेत. विशेष म्हणजे पाणीटंचाई असताना दोन वेळ प्रेशरने पाणी येत होते. नियमित व वेळेवर येत होते. आत्ता धरणे पूर्ण भरली आहेत. तरीसुद्धा नागरसेवकांनी दोन वेळ पाण्याची मागणी केल्यानंतरही नगरसेवकांना बदनाम करण्यासाठी पाण्याचे प्रेशर कमी करण्याचा प्रयत्न केला गेला नाही ना याची चौकशी व्हावी. धरणात पुरेसा पाणीपुरवठा आहे. नियोजनशून्य व गलथानपणामुळे यात जे अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांच्यावर कारवाई करावी. अन्यथा पुढे आम्हाला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल. शहरातील सर्व नागरीकांचा हक्कच आहे. त्यांना समान, पुरेसे, शुद्ध व नियमित पाणी द्यावे. शहरातील नागरीक तुमच्या तिजोरीत पै पै ने कर भरतात. म्हणून महापालिकेचे कामकाज चालते. ब प्रभागातील पाणीपुरवठा अधिकारी/कर्मचारी हे नागरीकांच्या सेवेसाठी आहेत. महापालिकेचे मालक नाहीत. इथून पुढे असे अरेरावीचे उत्तर दिलेतर आमच्या महिला भगिनी दूर्गेचा अवतार धारण करतील व सळो की पळो करुन सोडतील. अधिका-यांनी बंद पाडलेली पवना बंद पाईपलाईन योजना वर्षात पूर्ण होऊ शकली नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान व बदनामी झाली आहे. ते तपासले तर त्यांची कार्यक्षमता किती ते कळेल. पाणीपुरवठा ही लोकांची दैनंदिन गरज आहे. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत बाब आहे. त्याठिकाणी जबाबदार, विनम्र, संवेदनशील, संयमी अधिकारी नेमून तिथे लक्ष द्यावे असे मी याठिकाणी नमूद करते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,जेएनएनयूआरएम योजनेमार्फत माझ्या परिसरात पाण्याची टाकी बांधलेली आहे. सेक्टर २२ मध्ये पुनर्वसन प्रकल्प राबविला आहे. माझ्या भागात पाच मजली इमारत आहे. इमारतीच्या पाचव्या मजल्यापर्यंत पाणी पोहोचेल अशी गॅरंटी महापालिकेने दिली होती. पाचव्या मजल्यापर्यंत पाणी जाईल असा संप पाहिजे, तो संप तिथे बिलकूल नाही. पाण्याच्या टाकीवरुन पाणी सोडले जाते, ते चौथ्या पाचव्या मजल्यावर पोचत नाही. त्यामुळे नागरीकांच्या रोजच्या तक्रारी इतक्या वाढल्या आहेत. पहाटे सहा पासून फोन चालू होतो. रोज लोकांची बोलणी ऐकून ऐकून कंटाळा आला आहे. एकवेळ वाटते, नगरसेवक पदाचा राजीनामा देऊन टाकावा. संबंधित अधिकारी चांगल्या पद्धतीने काम करतात, लक्ष घालतात, फोन करतात. पण पाणी का पोहोचत नाही. न पोचण्याचे कारण कळत नाही. आपल्याकडे कोणीही अधिकारी असला तरी त्याची माहिती घेऊन त्यांना आधी पाठवा. ठेकेदाराचा माणूस व्हॉल्व्ह सोडण्यासाठी असतो. आमचा अधिकारी, जे.ई. फक्त व्हॉल्व्ह सोडण्यापर्यंत बघतो. आमच्याकडे तक्रारी सुरु होतात. मी गेल्या आठवड्यात रात्री ३.०० वा. पर्यंत वॉचमनला घेऊन पाणी चेक करत होतो. आपण शासनामार्फत करोडो रुपये खर्च केले आहेत. एवढी मोठी स्किम बांधली आहे, त्या लोकांना पाणी पोचलेच पाहीजे. त्यांना दिलेल्या मिटरमध्ये तुमच्या पाण्यातून वाळूचे कण जाऊन मिटर चोकअप होतात त्यामुळे पाण्याचा प्रॉब्लेम प्रत्येकाला येतो. मिटर साफ करायचे म्हटलेतर मीटर चोकअपमध्ये पाचव्या मजल्यावरील मीटर धोकादायक पद्धतीने काढावा लागतो. पाचव्या मजल्यापर्यंत कोणी जात नाही. झोपडपट्टीतील नागरीक तेवढा खर्च करु शकत नाहीत. या सगळ्या गोष्टी, हा विषय नागरीकांच्या अतिशय जिव्हाळ्याचा त्यांच्या जिवनाशी निगडीत आहे. पाचव्या मजल्यावर राहणा-या म्हाता-या माणसांना देखील दुस-या, तिस-या मजल्यावर येऊन पाणी भरावे लागते.

तुम्ही स्किम चांगली केली आहे. नागरीकांना सुविधा देणे तुमचे आमचे कर्तव्य आहे. नियोजन नसल्यामुळे पाणी पाचव्या मजल्यापर्यंत पोचत नाही. माझी विनंती आहे, पाणी का पोचत नाही याची माहिती मिळाली तरी बरे होईल.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आत्ताच सभागृहातील सर्व सहकाऱ्यांनी पाणी पुरवठ्यासंदर्भात विषय मांडला आहे. माझे मत आहे, आपल्या महापालिकेचे ६४ प्रभाग आहेत. या ६४ प्रभागांमध्ये पाणीपुरवठा केला जातो. या ६४ पैकी ४० प्रभागांमध्ये दोन वेळ पाणीपुरवठा केला जातो आणि २४ प्रभागांमध्ये एक वेळ पाणीपुरवठा होतो. दापोडी हा माझा प्रभाग सुद्धा त्यामध्ये आहे. पाण्याची इतकी अडचण आहे. काय होते काय होत नाही. चार महिन्यांपासून पाणी टंचाई निर्माण झाल्यानंतर एक वेळ पाणी केल्यामुळे आमच्या प्रभागातील पाण्याची प्रश्न मिटला आहे. आत्ता चार दिवसांपूर्वी मी दोन वेळ पाणी पुरवठा सुरु केल्यानंतर पुन्हा ओरड सुरु झाली आहे. या ४० प्रभागांना झुक्ते माप देता. आपली अशी दुटप्पी वागणूक योग्य नाही. आजही एक वेळ पाणी आहे. ते जोपर्यंत पूर्ण प्रेशरने मिळत नाही, तोपर्यंत इतर प्रभागांना दोन वेळेला पाणीपुरवठा करु नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर पाणीपुरवठ्याचा विषय म्हणजे सगळ्यांच्या आवडीचा, अतिशय जिव्हाळ्याचा विषय असे म्हणण्यापेक्षा आमची सगळ्यांची नाळ ज्यांच्याशी जोडली आहे, त्या मतदारांना जे हवे आहे ते निश्चितपणे या सभागृहामध्ये छातीठोकपणे आम्ही मांडणार. त्यासाठीच मतदारांनी आम्हाला इथे पाठवले आहे. हे करताना आम्ही कुठेही कमी पडणार नाही हे मी सगळ्यांच्या वतीने तुम्हाला सांगते. वास्तविक पाहता, सहा महिन्यांपूर्वी आपण ६०% प्रभागांना दोन वेळ पाणीपुरवठा करत होतो. ४०% शहराला एक वेळ पाणीपुरवठा करत होतो. त्यावेळी कोणाचीही तक्रार नव्हती. अधिका-यांना म्हणून झाले. गटनेत्यांनी पाण्याची परिस्थिती पाहून शब्द दिला. त्यांनी काही वावगे केले असे नाही. एक वेळ पाणीपुरवठा करा. दिवसाआड करा. त्याला होकार दिला. नगरसेवक यांनी तितक्याच प्रामाणिकपणे प्रत्युत्तर दिले. प्रत्येकाने प्रशासनाला मदत केली. पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा सुरु झाला. पुन्हा एकदा दोन वेळ पाणीपुरवठ्याची मागणी केली. मला वाटले नाही, आम्ही चुकीची मागणी केली. नोकरीला जाणा-या महिला पाणी भरु शकत नव्हत्या. त्यांनी काय करायचे? अधिका-यांचे सेटींग व्यवस्थित होते. त्यांना दोन वेळ पाणी करायचे नव्हते. गटनेते म्हणतात, स्थायी समितीत दोन वेळ पाणी करावे म्हणून मागणी केली होती. आयुक्तांकडे मिटींग झाली, त्यामध्ये २६ तारखेला दोन वेळ पाणी करु असे सांगितले होते. नक्की कोणती २६ तारीख सांगितली होती. शेवटी स्थायी समिती अध्यक्ष फार वाईट भाषेत बोलले त्यावेळी पाण्याची व्यवस्था झाली. अधिकारी म्हणून आम्ही कसे बरोबर आहोत हे दाखवण्याचा खोटा प्रयत्न चालू आहे. सहा महिन्यांपूर्वी प्रभागांमध्ये व्यवस्थित पाणी येत होते. मग या सहा महिन्यांतच लोकसंख्या दुप्पट झाली का. लोकसंख्या अचानक वाढली का. कुठेतरी अधिकारी सिद्ध करतात, नगरसेवकांची मागणी कशी चुकीची आहे व आम्ही करतो ते बरोबर आहे हे करत असतात. स्काडा सिस्टीम शहराला दिलीतर हेलियम डिडक्शन म्हणजे जमिनीखालील पाण्याची गळती शोधण्यासाठी हेलियम सिस्टीमची मान्यता घेतली. तुम्ही साडे चार कोटींचा विषय मंजूर केला.

शहरात स्काडा सिस्टीम केल्यानंतर २४ तास पाणी देऊ असे सांगितले होते. किती खोटे बोलतात. हे शक्य नाही हे कबूल करा. केवळ नगरसेवकाचा अट्टाहास आहे म्हणून दोन वेळेला पाणी येणे असे नाहीतर ही गरजच आहे. दोन वेळेला पाणी देणे हा प्रशासनाच्या कर्तव्याचा भाग आहे. नगरसेवक त्या त्या वेळेला सहका-याची भावना दाखवतो. लोकांना तयार करा, मार्गदर्शन करा. पाण्याचा योग्य वापर, कमीत कमी वापर करा. नागरीक तेवढेच सहकार्य करतील. जमिनीखालील पाण्याचे लिकेजेस शोधण्याचा प्रयत्न करतात. व्हॉल्व्ह असतात, त्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचे लिकेज होते, ते तुम्हाला चालते. त्याच्यावर खर्च काय काढणार ते डोळ्याने दिसते. परंतू जमिनीखालील लिकेजेस शोधले पाहीजेत परंतू याठिकाणी आमच्या नागरीकांना दोन वेळेला पाणीपुरवठा झालाच पाहीजे. नागरीकांना वेठीस धरू नका. तुम्ही बरोबर का आम्ही बरोबर हा वादाचा मुद्दा नाही. धरणात जेवढे पाणी आहे तेवढ्या प्रमाणात तो पाणीपुरवठा झाला पाहीजे. श्री.एम.टी. कांबळे म्हणतात, प्युरिफिकेशन संथ आहे, तेवढे करतो. आपण ४५० एमएलटी पाणी उचलतो. त्या पद्धतीने करुन सन २०२१ पर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होईल यासाठी सेंटर उभे केले आहे. अजून ७ वर्षे जायची आहेत. त्यानंतर काय अवस्था होईल. थेंब थेंब पाणी आणि जा पुढच्या घरी अशी अवस्था आहे. मी आमच्या सगळ्यांच्या वतीने आपल्याला विनंती करते की, नागरीकांना वेठीस धरु नये. पूर्वी जसे होते त्यापद्धतीने पाणीपुरवठा सुरळीत असला पाहीजे.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपळे गुरव परिसरातील लोकसंख्या पाहिलीतर नवीसांगवी, पिंपळेगुरव जवळकरनगर, सुदर्शननगर येथील लाखो लोकसंख्येला ज्याप्रमाणात पाणी दिले जाते त्याचा आपण सर्वे केलातर सगळ्या बाबी समोर येतील. सध्या पिंपळे गुरव परिसरातील लोकसंख्येला लागणारा पाणीपुरवठा करण्यासाठी ज्या टाक्या बांधल्या आहेत, त्या टाक्याच भरल्या जात नाहीत. हा पाणीपुरवठा विभागच मूळात विस्कळीत विभाग आहे. कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने जे कामगार ठेवलेले आहेत, त्यांच्याकडे प्रशासनाचे किती लक्ष आहे याचा आढावा घ्यावा. आणि म्हणून चार/पाच टाक्या बांधलेल्या असताना देखील माझ्या वॉर्डात रावेतवरुन बायपासचे पाणी येते. मी माझे सहकारी मित्र मा.संजय काटे यांच्या दापोडी परिसरात जातो. या पाणी गळतीकडे प्रशासनाचे लक्ष आहे का नाही हा पहिला प्रश्न निर्माण होतो. एवढी लांब पल्याची लाईन माझ्या वॉर्डात लिकेज झाली तर याठिकाणी हजारो लिटर पाणी वाया जाते. माझा प्रभाग आहे हा पूर्णपणे उतारावरचा प्रभाग आहे. तिथे पाणी संपल्यानंतर येते. पाण्याची लाईन भरण्यासाठी एक तासाचा कालावधी लागतो. परंतू याठिकाणी पाणी संपल्यानंतर लोकांना पाणी मिळणे शक्य झाले. तो माणूस एक तासात व्हॉल्व्ह बंद करतात व लोकांच्या तक्रारी सुरु होतात. ज्यावेळी माझ्या प्रभागामध्ये एक वेळ उन्हाळ्यात पाणी चालू केले होते, त्यावेळी नागरीकांना आवाहन केले होते. शासनाचे अधिकारी असतील त्यांना आवाहन केले होते. तीन तास पाणी ठेवल्यानंतर दोन तासात पाणी भरपूर मिळते होते. आता दोन वेळ पाणी सुरु झाल्यानंतर दोन दिवसांत ५० लोकांच्या तक्रारी आल्या होत्या. आज सकाळी ऑफीसमध्ये २५/३० महिला आल्या होत्या. पाईपचे पाणी दोन वेळेला ठेवले. माझ्या प्रभागात कधीही पाणी मिळणार नाही, कधीही तक्रार संपणार नाही. म्हणून अधिका-यांबरोबर बसून नोटीस केलेली आहे. ज्या सूचना दिल्या आहेत, त्या पद्धतीने त्या परिसराला पै पै ने

आहे तिथे एक वेळेला पाणी द्यावे. जेणेकरुन प्रेशरने पाणी मिळेल व त्यांचा प्रश्न सुटेल. दोन वेळेला पाणी येते पण प्रेशर मिळत नाही. त्यापेक्षा मला बायपासचे पाणी संपूर्ण प्रभागाला दोन वेळ पुरते. नवीन टाक्यांचे उदघाटन अजितदादांनी केले. उदघाटन करुन दोन वर्षे झालीत. ही टाकी भरली का जात नाही. त्या टाकीवर एक वॉर्ड भागू शकतो. जी टाकी बांधली त्याचे पाणी माझ्या प्रभागाला का मिळत नाही हा प्रश्न पडला आहे. आम्हाला सांगितले जाते, याचे पाणी प्र.क्र.५६ला दिले जाते. मग चार टाक्यांचे पाणी कुठे जाते. आम्हाला दिलेली टाकी ही माझ्या प्रभागासाठी दिलेली आहे. त्याचे संपूर्ण पाणी माझ्या प्रभागाला मिळावे अशी मी मागणी करतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,माझी आपल्याला विनंती आहे की, दोन वेळेला पाणी देत असताना ज्या वॉर्डामध्ये पाणी नीट मिळत नाही, त्याची व्यवस्था आधी करा. मा.नाना काटे यांनी सांगितले ते बरोबर आहे. जेव्हा शहराला एक वेळ पाणी मिळत होते, तेव्हा ते व्यवस्थित मिळत होते. ज्या वेळेपासून दोन वेळेला पाणी द्यायला सुरुवात केली आहे, तेव्हापासून दापोडी भागातील पाण्याचा समतोल बिघडला आहे. ब-याच ठिकाणी पाणी पोचत नाही. त्यातल्या त्यात पाणी गढूळ येते. माझी टिप पूर्ण गढूळ पाण्याने भरले होते. दापोडी पुणे महापालिकेमध्ये असताना तो शहराचा शेवटचा भाग होता. सगळीकडचे पाणी संपल्यानंतर गाळासकट पाणी येत होते. आजही हिच परिस्थिती आहे. दापोडी पिंपरी चिंचवड शहराचा शेवटचा भाग आहे. गढूळ पाणी यायला पुन्हा सुरुवात झाली आहे विनंती राहील, इतर भागांमध्ये दोन वेळ पाणी देत असताना पाणी प्रेशरने येते का नाही याची खात्री असल्याशिवाय देऊ नये. पिंपरी चिंचवडमधील सगळेच लोक इथले नागरीक आहेत सगळेच लोक टॅक्स भरतात. त्यामुळे कुठेतरी वॉर्डात एक वेळ पाणी येते तेही द्यायचे नाही. त्याच वॉर्डात दोन वेळ पाण्यासाठी भूमिका घेऊ नका. असा निर्णय झटक्यात घेऊ नका. कोणालातरी बरे वाटेल म्हणून असे निर्णय घेऊ नका. धरणातील पाणी संपल्यानंतर आपण पावसाची वाट बघतो. मग बाकीचे प्रयोग सुरु करतो. त्यापेक्षा पावसाळयात पाऊस दोन महिने पडला नाहीतर कितपत पाणी पुरणार आहे. याचे संपूर्ण नियोजन झाल्याशिवाय हा निर्णय घेऊ नका. आमच्या वॉर्डला पुरेसे व स्वच्छ पाणी द्यावे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज खरेतर पाणीपुरवठ्याच्या विषयाला विशेष बैठक घेऊन अनेक वेळेला मंजूरी दिलेली आहे. खरेतर माझे मत आहे ज्यावेळी आपण मागणी करतो, तेव्हा त्याला पाणीपुरवठ्याबाबतीत संबंधित अधिका-यांचे सुद्धा काम आहे. त्यांनी आपल्याला सांगितले पाहीजे. दोन वेळ पाणी करणे योग्य आहे का, एक वेळ पाणी करणे योग्य आहे का. आज 24 तास वेळ पाण्याची मागणी पूर्ण होते आहे का. मग काहीतरी तांत्रिक अडचणी आहेत. पण गेले काही दिवसांपूर्वी कोरडा दुष्काळ होता. तेव्हा एक वेळ पाणीपुरवठा केला. त्यानंतर पुन्हा चांगला पाऊस झाला, धरण भरले गेले. त्यानंतर दोन वेळ पाणीपुरवठा केला. पण काही लोकांची मागणी आहे, पाणी पुरवठा एक वेळ करा. ही मागणी सुद्धा तुम्ही पूर्ण केलीत याचा अर्थ प्रशासनाचे ठाम मत या यंत्रणेवर नाही. वास्तविक त्यांनी सुद्धा सांगितले पाहीजे. त्यावेळी चांगली परिस्थिती होती. दोन वेळ पाणी केलेतर विस्कळीतपणा होईल किंवा उलट परिस्थिती होईल. परंतू कोणत्याही परिस्थितीत प्रशासनाचे

ठाम मत समोर नाही. कोण म्हणते दोन वेळ पाणी द्या. मागणीप्रमाणे पाणीपुरवठा करायचा प्रयत्न करता. आज परत आम्ही ओरड करतोय. प्रशासनाचे काहीच मत नाही का. कोण आमचा वॉर्ड सोडून सांगतो, तसे शहर पातळीवर समजून सांगितले पाहीजे. मा.महापौर साहेब, तुम्ही आम्ही एका परिसरात आहोत. शहराचा शेवटचा भाग आहे. दापोडीसारखा भाग असेल, किवळे, मोशी असेल. पुढील नवीन गावे समाविष्ट करण्याचा प्रयत्न होतो आहे. यांना व्यवस्थित पाणी देऊ शकत नाही मग पुढील गावांना पाणी कसे देणार यात आहे ती यंत्रणा व्यवस्थित राबवू शकत नसूतर शंभर टक्के प्रशासनाचा दोष आहे. मी ४/५ वर्षांपासून सांगतोय, पाणीपुरवठ्याबाबतीत पूर्णपणे शहरात नियोजन करण्यासाठी चांगले इंजिनिअर, चांगले कन्सल्टंट यांची शंभर टक्के आवश्यकता आहे. फ्रेंच टेक्नॉलॉजी घेताय. त्यांनी केलेली यंत्रणा विकसित करतोय. कोणी काय सांगतेय म्हणून कोट्यावधींचे मिटर लावले. १० ते १५ कोटींची स्काडा सिस्टीम लावली. त्याचा लोकांना काय फायदा झाला. फक्त पाणी मोजतोय. त्याच्यावर कंट्रोल झाला पाहीजे. तंत्रज्ञान कुठे-कुठे वापरावे याची माहिती झाली पाहीजे. कॉन्ट्रॅक्टरला फायदा झाला. नागरीकांपर्यंत पोचले आहे. मनपाचे अधिकारी उघडपणे सांगतात, ३० टक्के लिकेज आहे. लिकेज शोधण्यासाठी कोणता प्रयत्न केला नाही. स्काडा ऐवजी लिकेज शोधले असते तर. लिकेज सोडले आणि पाणी मोजत बसले. गळती कुठली आहे तेच कळत नाही. शंभर लोक सांगतात, गळती थांबवा. गळती थांबवता येत नसेल तर काय उपयोग आहे. शहरात ६० टाक्या आहेत. टाक्यांचे शहर झाले आहे. महाराष्ट्रात कोणत्याच शहरात एवढ्या टाक्या नाहीत. च-होली इथे उंच टेकडी आहे, त्याचा वापर करा. अर्ध्या शहराला पाणीपुरवठा होईल. नैसर्गिक गोष्टींचा वापर करत नाहीत. विनाकारण खर्चाच्या मागे पडतो. व्हॉल्व्ह ऑपरेशन, मेंटेनन्स देखभाल दुरुस्ती आली. आपण म्हणतो, करदात्यांना पाणी मिळाले पाहिजे. दरवेळची किटकिट आहे. पाणी ही मुलभूत सुविधा देऊ शकत नसाल तर ही प्रशासनाची लाजिरवाणी गोष्ट आहे. तुम्ही तेच आहात. आम्ही बदलत असतो. अधिका-यांना वाटत नाही, आपले नियोजन चांगले असावे. प्रशासनामुळे हे बोलायची वेळ येते आहे. तुमचा कंट्रोल नाही. कशासाठी पाणीपुरवठ्यासारख्या विषयावर बोलायचे. बेस्ट सिटी अवॉर्ड मिळूनही दोन वेळ पाणी देऊ शकत नसालतर कशासाठी बोलतोय. कमिशनर यांच्या दालनात दरवर्षी दोन तीन बैठका झाल्या पाहीजेत. अडचणी काय आहेत ते पाहीले पाहीजे. प्रत्येक वेळी एक तास, अर्धा तास पाणी असते. हे शंभर टक्के चुकीचे आहे. सांगवीसारखा भाग कित्येक वर्षे पाण्याच्या अडचणीत होता. आज सुद्धा पाण्याची अडचण आहे. जे.ई.कडे कित्येक वेळा तक्रार केली, पाणी एक वेळच ठेवा. माझी मागणी आहे, एकवेळच पाणी राहिले पाहिजे. त्यात झोनिंग करता आले पाहीजे. कुठे सकाळी, कुठे संध्याकाळी कुठे दुपारी असे झोनिंग करता आले पाहीजे. शंभर टक्के नागरीकांची कोणतीही तक्रार राहणार नाही. प्रत्येक वेळी आम्ही जी.बी.त ओरडायचे. प्रशासनाचा शंभर टक्के कमीपणा आहे. त्याचे नियोजन करा. मा.महापौर तुम्ही आदेश द्यावा. आयुक्तांनी याबाबतीत शहर पातळीवर बैठक घ्यावी. तांत्रिक मुद्दे समजून घ्या. राजकारणानुसार पाण्याची मागणी करणे चुकीचे आहे. त्यांना काय वाटते, काय सोयीचे वाटते ते सांगावे. त्याप्रमाणे ॲडजस्टमेंट करुन हायवे पलिकडील भाग, हायवे अलिकडील भाग असे दोन भाग या शहराचे होतात. आयुक्तांनी बैठक घ्यावी. हा विषय पूर्ण मार्गी लावावा. त्यासाठी मा.महापौर साहेब यांनी आदेश द्यावा.

मा.विमल काळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दोन वेळ पाणी केल्यापासून माझ्या प्रभागात दोन/चार दिवसांपासून पाणी येत नाही. हंडा भरतो आणि पाणी लगेच जाते. माझा पूर्ण वॉर्ड ऊंचावर आहे. पाण्याचे नियोजन खूप बिघडले आहे. मला महिलांचा मोर्चा घेऊन यावे लागेल. एक वेळ पाणी केले होते. दोन वेळचे पाणी एक वेळ करुन द्या.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मागील मा.महापालिका सभेमध्ये तुम्ही आदेश दिला होता. ज्याठिकाणी ज्या वॉर्डात पूर्वी दोन वेळ पाणी होते तिथे एक वेळ कराव व जिथे एक वेळ होते तिथे एक वेळ करा. प्रशासन मग्रुर व आयुक्त प्रसिद्धी लोलूप असून, सभागृहाने आदेश दयायचा, सभागृहाने मान्यता दयायची व नंतर आयुक्त बैठक घेऊन जाहीर करतात, प्रशासन उदयापासून दोन वेळ पाणी देणार. याचा मी निषेध करते. ज्या नगरसदस्याने मान्यता दिली असेल, त्या विषयाचे क्रेडीट घ्यायचे काम आयुक्त व त्यांच्या सहका-यांनी करु नये. आत्ता काही सदस्य म्हणाले, आमच्याकडे एक वेळ पाणी होते त्यावेळी मोठ्या प्रमाणात पाणी येत होते. निश्चितपणे काही भागांत तशी परिस्थिती असेलही. दोन वेळेला पाणी करा, मागणी केली तरी तिथे मुळात दोन वेळेला आधी पाणी होते का, एक वेळेला पाणी आहे का, अशी दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाणी एक वेळ का करु नये म्हणून गटनेत्यांना सिनिअर नगरसेवकांना आयुक्तांनी बोलवून घेतले. आयुक्तांनी दोन वेळ पाणी करु द्या म्हणून विनंती केली. म्हणून दिवसाआड पाणी देण्याचा नियम केला. त्याला नगरसदस्यांनी मान्यता दिली. सभागृहाने विषय पास केल्यानंतर त्यांची जिरवायची तुम्ही शहाणे आहात का, तुम्हाला काही कळत नाही. अशी भूमिका प्रशासन घेते आहे. पूर्वी दोन वेळ पाणी केले असताना दिसले नाही. चार महिन्यांपूर्वी पाणी व्यवस्थित येत होते. असे आत्ता काय घडले प्रेशर कमी/जास्त होते आहे. त्यांच्यावर प्रेशर वाढले. ते काम चांगले झालेच का ते अधिका-यांना पण विचारले पाहीजे. २००७ मध्ये मिटर पद्धत आणल्यानंतर याच सभागृहात मिटर पद्धत लागू करु नये म्हणून आम्ही विरोध केला होता. आमच्या विरोधाचे मतही नोंदवले गेले, त्यावेळी आपण तत्कालिन महापौर यांनी सांगितले होते, आम्ही २४ तास पाणीपुरवठा करणार आहोत म्हणून मिटर पद्धत लागू केली. तुम्ही एक वेळ सुद्धा पाणीपुरवठा करु शकत नाही. शंभर टक्के मीटर पद्धत काढून टाकले पाहीजे. ज्यांनी मीटर लावले त्यांचे काय? शंभर ते सव्वाशे कोटी खर्च केला तरी हात वर करुन मोकळे व्हायचे. मग हे नागरीकांचे पैसे आहेत. तुमच्या आमच्या घरातले नाही. आपण त्यांचा हिशोब देणे लागतो. आपण विश्वस्त म्हणून काम पाहतो. आपली सुद्धा ड्युटी आहे. आपले कर्तव्य आपण बजावले पाहीजे. दोन वेळ काय चोवीस तास पाणी करणार असे सांगितले होते. चोवीस तास पाणी करणार पण दोन वेळ पाणी दयायची ओरड आहे. काही चांगले करायचे अशी खेळी चालली आहे. काहीही करुन नगरसेवकांना गुडघ्यावर आणायचे असा चंग प्रशासनाने बांधला आहे. मागील वर्षी डेंग्यूचे 145 रुग्ण आढळले होते. या वर्षी डेंग्यूचे ३५० रुग्ण आहेत. मागील जी.बी.त डॉ.रॉय यांनी सर्व माहिती दिली होती. डेंग्यूचे डास स्वच्छ पाण्यावर होत असले तरी पाणी एक वेळ केले होते. म्हणून लोक पाणी साठवत होते. म्हणून डेंग्यूचे प्रमाण वाढले अशी शंका यायला शंभर टक्के जागा आहे. म्हणून दोन वेळ पाणी करुन बघा. एखादे घर उद्धवस्त होण्यापासून वाचेल. त्या पाठिमागे हा हेतू होता, त्या हेतूलाच हरताळ फासण्याचे काम प्रशासन करते आहे.

स्काडा सिस्टीमसाठी चारशे कोटी रुपये खर्च केला. स्काडावाल्यांनी सांगावे, त्याचे पेटंट आपल्याकडे आहे का. त्याची विश्वासार्हता काय आहे. जे तंत्रज्ञान आपण वापरतो. खरेतर हे योग्य आहे का अयोग्य आहे. योग्य असेल तर तुमचा स्काडा काय सांगतो. चार महिन्यांपूर्वी सुरु होती. चार महिन्यांनंतर यंत्रणा फेल झाली का ते सांगा. पाणी गळतीचे प्रमाण किती आहे. ३० टक्के पाणी गळती आहे ते शोधण्याचे काम कोणाचे आहे. नवीन तंत्रज्ञान आणले पाहीजे त्याचे स्वागत केले पाहीजे. परंतू त्याचा उपयोग होत नसेलतर कॉम्पेटिशन नसेल तर उपयोग काय. एचसीएल कंपनी यांच्याकडे तिथे स्काडा सिस्टीम शिकवली जाते. त्यांना विचारले त्याची विश्वासार्हता आहे का नाही ते विचारा. त्यांना एकदा बोलवा. छोटे-मोठे कोर्सेस देणारी आयआयटी सारखी संस्था आहेत. ते शिकवा. किमान त्याची ओळख तरी होईल. किमान शहरातील प्लॅन आहे. आपल्याकडे मेन पाईपलाईनचे नकाशे सुद्धा महापालिकेत उपलब्ध नाहीत. उद्या विचारायचे म्हटले तर एखादा अधिकारी निवृत्त झाल्यावर त्याच्या घरी जाऊन विचारायचे का. महापालिकेत नकाशे तयार असले पाहीजेत. त्यासाठी सुद्धा आदेश दिला पाहीजे. यंत्रणेतील काही पाईप खराब झाले असेल तर एवढा तेवढा नाहीतर अर्ध्या किलोमीटर पर्यंत रस्ता खोदला जातो. आपण मुळात योजना करताना बेसिक काळजी घ्यायला हवी होती ती घेतली जात नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. आत्ता ते करु शकतो. मला दोन प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. स्काडाचे पेटंट केले आहे का, त्याची विश्वासार्हता आहे का. पेटंट केले असेलतर ते कुठे केले आहे याचे उत्तर द्यावे.

मा.अजित गव्हाणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी खरेतर प्रशासनाला या सभागृहाची विनंती आहे की, आमच्या इथल्या नागरीकांना पुरेसे पाणी मिळावे. दोन वेळ पाणी मिळावे, २४ तास मिळावे हा मुद्दा नाही. परंतू पुरेसे पाणी मिळावे. ज्या कुटूंबातील महिला घरात नसतात, त्यांची खूपच अडचण होते. सकाळी पाणी न आल्यामुळे त्यांची पाणी भरायला अडचण होते म्हणून आम्ही सर्व नगरसेवक म्हणून मागणी करत होतो मा.सिमाताईंनी उल्लेख केला. एकिकडे चोवीस तास पाणीपुरवठा करणार, प्रशासनाने ५ वर्षापूर्वी मागणी केली होती. परंतू प्रत्यक्षात एक वेळ सुद्धा पाणीपुरवठा करु शकत नाही. चोवीस तास पाणीपुरवठा करु म्हणून मिटर पद्धत आणली. टप्याटप्याने सगळ्या शहरात २४ तास पाणीपुरवठा होईल अशी अपेक्षा होती. प्रशासनाने काही वॉर्ड ज्या पद्धतीने चोवीस तास पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला. २४ तास पाणीपुरवठा काही ठिकाणी चालू आहे. त्या दृष्टीकोणातून प्रशासनाचे काय प्रयत्न चालू आहेत, प्रशासनाने स्पष्ट करावे. ७/८ वर्षापूर्वी एखादे नियोजन ठरते. त्याच्यापुढे वस्तुस्थिती आहे ती सभागृहाला नगरसेवकांना सांगीतली पाहीजे. प्रशासनाने हे सांगितले पाहीजे. पिंपरी चिंचवड शहर झपाट्याने वाढते आहे या शहराला पाणीपुरवठा देणे जमत नाही. ही वस्तुस्थिती कधीतरी सभागृहाला जाहीरपणे सांगितली पाहीजे. नागरीकांपर्यंत हे पोचले पाहीजे. २४ तास पाणीपुरवठा करता येत नसेलतर त्याचा खुलासा नागरीकांपर्यंत झाला पाहीजे. पाण्याचा दुसरा सोर्स आहे, इंद्रायणी नदीवर करायचे ठरवले होते. त्यासंदर्भात शासन स्तरावर काही दिवसांपासून प्रयत्न चालू आहेत. त्याची सद्यस्थिती काय आहे याचा खुलासा झाला पाहीजे. बंद पाईपलाईन योजना चालू करण्याच्या दृष्टीकोणातून प्रशासनाने नेमकी काय भूमिका घेतली आहे. नेमके ते काम होणार का नाही याची सभागृहाला माहिती नाही.

प्रशासनाने यासंदर्भात सभागृहाला किंवा पिंपरी चिंचवडशहराला सांगितले पाहीजे की, बंद पाईप योजना सुरु करण्याच्या दृष्टीकोणातून हे प्रयत्न चालू आहेत. पत्रकारांना सांगितले पाहीजे. टि.व्हीवर कुठेतरी हे आले पाहीजे. मग नागरीकांना कळेल, २४ तास पाणीपुरवठा का होत नाही. आज दोन वेळ सुद्धा पाणी देता येत नाही. पाणीपुरवठ्याच्या ब-याच अधिका-यांनी सांगितले आहे, दोन वेळ पाणी मागू नका. आम्ही त्यांना सांगितले, आम्हाला दोन टाईमपेक्षा सकाळी पाहीजे आहे. तसे देता येत नसेलतर एका भागाला ३ दिवस पाणी दिल्यानंतर दुस-या भागाला ३ दिवस पाणी द्या. श्री.एम.टी. कांबळे यांच्याकडे खूप मोठमोठ्या कामांचा चार्ज आहे. पाणीपुरवठा हा कटकटीचा विभाग आहे. त्यांच्याकडे एकत्रित चार्ज आहे, त्यामुळे त्यांना या गोष्टीला कधीच न्याय देता येत नसेलतर जी काही अधिका-यांची यंत्रणा आहे ती कुठेतरी कमी पडते. त्यांची संख्या मुळात कमी आहे. पिंपरी चिंचवड शहराचे भविष्यातील नियोजन करण्यासाठी शंभर टक्के चांगला कन्सल्टंट अपॉईंट करुन, त्रुटी दूर करण्यासाठी, लिकेजेस काढण्यासाठी खरोखरच बाहेरच्या कन्सल्टंटची गरज आहे. आपली जी पाणीपुरवठ्याची यंत्रणा आहे. प्लंबरांची बदली झाली तर नवीन माणसाला काही कळत नाही. कुठे काही नाही. कुठेही प्लॅनिंग नाही. कम्प्यूटर सिस्टीम नाही. ऑफीसमध्ये कुठेही शंभर टक्के सिस्टीम नाही. कोणीही बदली करा तरी सगळे माहिती आहे असा अधिकारी नाही. त्यामुळे याही गोष्टीकडे लक्ष घालावे. प्रशासनाने ठोस पाऊले उचलली पाहीजेत. भविष्यकाळात कोणीही रिटायर्ड झाला, बदली झालीतरी सगळ्यांना यंत्रणा माहिती पाहीजे. याठिकाणी काही नगरसेवकांचे म्हणणे आहे, एक वेळ पाणी द्या, दोन वेळ पाणी द्या. मला वैयक्तिक वाटते, माझ्याकडे दोन वेळ पाणी मिळाले पाहीजे. प्रशासनाने यातून मध्य मार्ग काढावा व लोकांना चांगले व मुबलक पाणी द्यावे अशी विनंती करतो.

मा.सुलभा ऊबाळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर आत्ता आयुक्त हवे होते. त्यांनी हे सगळे घडवले आहे. मी त्यांना आज चतुर बिरबल अशी उपमा देणार आहे. आयुक्त अत्यंत चतुर आहेत. त्यांनी आमच्या नगरसेवकांमध्ये भांडणे लावून दिली. आमच्या अधिका-यांना काहीही निर्णय घ्यायचा अधिकार नाही. आयुक्त साहेब सांगतील तसे त्यांना करावे लागते. आयुक्तांनी गटनेत्यांची बैठक घेतली होती. आयुक्तांनी आधीच सगळे तयार करुन आणले होते. त्यांचा एक कलमी कार्यक्रम, सगळे वाचून दाखवायचे. आम्ही भरपूर बोललो असे करायला पाहीजे, तसे करायला पाहीजे. आम्ही बोलालो पण त्यातील एकही त्यांनी ॲड करुन घेतले नाही. एकही डिलिट केले नाही. त्यांनी लिहिले आहे. गटनेत्यांची परिस्थिती अशी आहे. ही विचार करायला लावणारी घटना आहे. कोणीही काही म्हटले नाही. सगळ्यांनी ऐकले. आत्ता जसे चित्र दिसते आहे. आपण बेस्ट सिटी अवॉर्ड विजेते आहोत. तरीही प्रत्येकाला पाण्याबाबतीत कायम बोलावे लागते हे दूर्दैव आहे. आयुक्त साहेबांनी याच संधीचा फायदा घेतला आहे. गटनेत्यांची बैठक वाईट कामाला लावून द्यायची. आमच्याबरोबर बैठक लावायाची म्हणून लावतात. टीडीआरसाठी बैठक लावता, बंगल्यावर बिल्डरांची मिटींग लावता त्यावेळी आम्हाला सुद्धा बोलवत जा. वाईट कामासाठी आम्ही. स्थायी समितीतला एक सदस्य म्हणतो, आम्हाला दोन वेळ पाणी द्या. त्यानंतर दोन वेळ करायचे ठरले. एकजण सांगतो, आम्हाला एक वेळ पाणी द्या. एक वेळ पाणी द्या किंवा दोन वेळ पाणी द्या. पण एका वॉर्डला कमीत

कमी ५ एमएलटी पाणी लागते. दोन वेळ पाणी केलेतरी अडीच अडीच असे ५ एलएलटीच पाणी घेतो हे सांगायची गरज नाही. दोन तास फोर्सने पाणी दिल्यानंतर ते वाटून वाटून सगळ्यांना जाते. शहराची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेतलीतर मराठवाड्यात पाऊस पडलेला नाही. कोकणात ओला दुष्काळ पडला आहे असे म्हणतात. तसा महापालिकेत दुष्काळ पडला आहे. इथे एक वेळ पाणी सोडल्यानंतर पाणी जाते हे माहित आहे. परंतू प्रत्येक भागाची भौगोलिक परिस्थिती काय आहे. जो भाग उतारावर आहे, तिथे कधीही पाणी सोडलेतरी पाणी असते. त्यांना काही गरजच नाही. एक वेळ असो, दोन वेळ असो. ज्या इमारतींमध्ये टाक्या आहेत, तिथे पुरेसे पाणी भरले आहे तेवढे नागरीकांना दिलेतर त्यांना सुद्धा २४ तास पाणी राहते आहे. जेवढा पुरवठा पाहीजे, तेवढे पाणी द्यायला हवे. बैठकीची घरे आहेत त्यांना पाणी साठवायला जागा नसते. प्रत्येक नगरसेवकाची वैयक्तिक भूमिका आहे. आयुक्त हेच हेरतात. याचे त्याला त्याचे याला, तो तसा म्हणाला. हे त्यांना बरोबर माहित आहे कुठे डेडलॉक करायचे. आयुक्तांना शहराची भौगोलिक परिस्थिती समजावून सांगीतली. त्यांना हे कळाले, जिथे खूप इमारती आहेत, तिथे टाक्या असतील तर त्यांना एक वेळ पाणी केलेतरी चालेल. मा.धनंजय आल्हाट आत्ता म्हणाले, एक वेळ द्या, मा.अजित गव्हाणे म्हणाले, दोन वेळ पाणी द्या. म्हणजे आमच्याआमच्यातच झाले. ज्याठिकाणी आवश्यकता आहे. माझ्या वॉर्डात २४ तास पाणी आहे. माझ्या वॉर्डात २४ X ७ ही योजना केली. तांत्रिकदृष्ट्या माझा वॉर्ड योग्य वाटला म्हणून, त्यावेळचे आयुक्त मा.आशिष शर्मा यांनी माझा वॉर्ड निवडला. माझ्या वॉर्डात कमीत कमी ११० इमारतींना खाली टाक्या बांधल्या नाहीत. इंटीग्रल इमारतीत टाकी बांधली जाते अशी येथे बांधली नव्हती. येथे कोणत्याही हौसिंग सोसायटीचे रजिस्ट्रेशन झालेले नाही. २० वर्षांपूर्वीच्या जुन्या इमारती कोणतीही गृहरचना संस्था नसल्यामुळे प्राधिकरणाने जागा सोडली नाही. कोणीही बांधायला तयार नव्हते. उंचावरील भाग असल्यामुळे लोक रोज पाण्यासाठी बोंब मारत होते. कार्यकारी अभियंता लडकत साहेब, दुधेकर साहेब होते. त्यांनी बघितले, या भागात पाणी वर चढत नाही, डायव्हर्ट होत नाही. प्रायोगिक तत्वावर करायचे असेलतर अशा ठिकाणी करणार जिथे पाण्याची जास्त गरज आहे. त्यांचे स्किल तिथे लागले जाईल जिथे टाक्या नाहीत. एका निमसरकारी संस्थेने केलेल्या कामाची चूक नागरीक भोगत आहेत. मनपाला सांगितले तर ते म्हणाले एका बिल्डींगवर जास्त नळ कनेक्शन देऊ शकत नाही. म्हणून लोक बादल्या लावून पाणी वर न्यायचे. एक बिल्डींगमध्ये ४० फ्लॅट असतील तर ४० बादल्या ठेवायच्यात का. त्यामुळे तो निर्णय घेतला गेला आहे. त्यामुळे कोणाच्याही मनात जेलसी असायची गरज नाही. मी स्वतः गटनेते असताना सुद्धा बैठकीत म्हणाले एक वेळ पाणी करायचे किंवा पूर्ण एक दिवसाआड करायचे. त्यावेळी सगळ्यात पहिल्यांदा माझ्याच वॉर्डात करा, चोवीस तास पाणी करा असे म्हटले नाही. अशी जाणीव ठेवली तर भविष्यात आयुक्त याचा फायदा घेणार आहेत. यात भौगोलिक परिस्थितीचा विचार करा. ज्यांना एक वेळ पाणी पाहीजे, त्यांना द्या. दोन वेळ पाणी देत असताना त्यांना तिथे का कमी पडतेय. प्रत्येक भाग उतारावर असणार नाही. कुठे तीव्र उतार असतो, कुठे चढ असतो. पाणी सोडले तर वाया जाईल. मा.अजित गव्हाणे यांच्याकडे भोसरी गावठाणाचा भाग अधिक आहे. तिथे कामाला जाणारी माणसे आहेत. त्यांना संध्याकाळी पाणी पाहीजे. आयुक्त साहेब आमच्यात भांडणे लावून काय साधणार आहेत. कन्सल्टंट पैसे घेऊन गेलातर काय साधले काही उपयोग

नाही. इथे बोलून काही उपयोग नाही. अधिका-यांना याचे उत्तर माहित असते. खरे उत्तर देण्याचे कोणाच्यात धाडस नाही. नवीन नगरसेवक त्यांच्या वॉर्डातल्या अडचणी सांगत असतात. महापौर साहेब, नगरसेवकांमध्ये वाद घडू नये. असे निर्णय घेऊ नयेत. श्री.एम.टी. कांबळे सिटी इंजिनिअर असले तरी त्यांच्याकडे कामाचा काही इतका लोड नाही. त्यांना इथे लक्ष द्यायला सांगा. जिथे जिथे आवश्यकता आहे, तिथे प्रत्येक नगरसेवकाला वाटले तर पत्र पाठवून लेखी मागवा. आत्ताच का हा खेळ खेळला जातोय. याचा सुद्धा विचार करा. नगरसेवक पाण्याच्या पाठिमागे लागून राहतील म्हणजे आम्हाला बाकीच्या गोष्टी कडेकडेने करता येतील. जिथे आवश्यकता आहे त्याप्रमाणेच नियोजन झाले पाहीजे. काही ठिकाणी एक वेळ पाणी व्यवस्थित येत असेलतर ते दोन वेळेला नको म्हणतात. दोन वेळेला पुरेसे आलेतर कशाला नको म्हणतील. आपल्याकडे आज धरण भरलेले आहे. धरण तेच आहे. लोकही तेच आहेत. आज मुंबई इथे गगनचुंबी इमारती असताना कुठेही पाण्याची तक्रार नाही. आपण जेएनएनयूआरएमचा फंड भरपूर आणला आहे. म्हणून बेस्ट सिटी ठरलो आहोत. कुत्री, डुकरे, उकिरडा, पाणीपुरवठा, मच्छर तेच आहेत. डेंग्यूवर आयुक्त साहेब आपण ओरड चाललेली ऐकली. परवा साहेबांनी अजितदादांना डेंग्यूवर तासभर लेक्चर दिले. डेंग्यूच्या आळ्यांचा जो प्रकार आहे तो आपल्याकडे घडला आहे. त्यात नवीन नाही. आयुक्तांनी त्याचा पाण्याशी संदर्भ लावला आहे. पवार साहेबांच्या भाषेत म्हणायचे तर किती जावईशोध लावायचा याचा नीट विचार करा. तातडीने आजच्या आज निर्णय घेताना एक नगरसेवक खूष होणार, दुसरा नाराज होणार. प्रत्येकाला वॉर्डात उत्तर द्यायचे आहे. तसतशी परिस्थिती वेगवेगळी आहे. किती एमएलटी पाणी सोडतात. दोन वेळ पाणी पाहीजे तर पूर्ण प्रेशरने पाणी द्या. गढूळ पाणी देऊ नका. मा.चंद्रकांता सोनकांबळे यांची उपसूचना आहे. आता नगरसेवक नगरसेवकपद नको म्हणायला लागले आहेत. पूर्वीप्रमाणे ॲडजस्टमेंट करुन २४ बाय ७ चे उत्तर सापडणार नाही. म्हाडाच्या इमारती असतील तरी शासकीय इमारतींना टाक्या लावल्या नाहीत. समाविष्ट गावांचा विषय आहे. त्या गावांमध्ये अंतर खूप आहे. भौगोलिक परिस्थितीचा विचार करा. कुठे कुठे १० एमएलटी पाणी लागते. कारण लिकेजेसचा विचार करत नाहीत. नुसते याच गोष्टीकडे आयुक्तांनी गांभिर्याने लक्ष देण्याची गरज नाहीतर निर्णय घ्यायची गरज आहे. गटनेत्यांच्या बैठकीत बोलत असताना कोणत्याही गोष्टीचे प्रोसिडींग ठेवले जात असेल तर आमच्या सूचना त्यात अंतर्भूत करुन घेणार असाल तरच आम्हाला इथून पुढे बोलवत जा. आमच्या नावावर कोणतीही गोष्टीचे चालणार नाही. कोणताही निर्णय घाईघाईने जाहीर न करता मेरीटने सुरुवात करा. वॉर्डपासून नियोजन करायला सुरुवात करा.

मा.राजेंद्र काटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ख-या अर्थाने मिटींग लावली. परंतू त्याचा इफेक्ट आमच्यापर्यंत कुठेही दिसलाच नाही. सगळीकडे भरपूर चर्चा झाली. १६ तारखेपासून दोन वेळेला पाणी होईल असे सांगितले होते पण त्याची अंमलबजावणी कुठेही वॉर्डात दिसली नाही. काही ठराविक नेते मंडळी डोळ्यासमोर ठेवून जे काही निर्णय घेता, प्रशासन निर्णय घेते, अतिशय चुकीच्या पद्धतीने निर्णय घेते. एका वॉर्डात प्रायोगिक तत्वावर करता. कशासाठी. बाकी लोक टॅक्स भरत नाहीत का. कुठेतरी २४ बाय ७ द्यायचे. काय आवश्यक बदल करायची आमची कपॅसिटी नाही का. एकाच वॉर्डासाठी हा निर्णय का.

बाकीच्यांनी काय केले. असे ठरवू नका. वॉर्ड डोळ्यासमोर घेऊन त्याचे प्रिपरेशन होते. ज्यांचे प्रभूत्व आहे, त्याच वॉर्डात अतिशय चांगल्या सुखसोयी पुरवायचे काम, चांगल्या प्रकारे दिसेल. पाणी दिलेतर मग बाकीच्यांनी काय केले आहे. बाकी नागरीकांचे काय प्रश्न आहेत. अधिका-यांना इतका वेळ काय करतो. त्यांना प्रॅक्टीकल भौगोलिक परिस्थिती माहित आहे. सगळी कामे झाली आहेत का. मोठमोठे इंजिनिअर अपॉईंट करतो. नागरीकांना ज्ञानाचा उपयोग होण्यापेक्षा सांगकाम्या म्हणून नाव झाले आहे का. त्यांचा वचक बसत नाही. राजा बोले दल हले असा प्रकार अधिका-यांबाबतीत झाला आहे. पाणी आले नाही म्हटले तर आयुक्तांपासून खालच्या जे.ई.पर्यंत सगळ्यांना फोन लावायचा. त्यानंतर काहीतरी हालणार. कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय काही करुन दाखवलेले नाही. महापालिका इतकी वर्षे अस्तित्वात येऊन इतक्या वर्षात कोणतेही कौशल्य नाही, प्रशासनाकडे कौशल्य नाही. महापालिकेला ए ग्रेड दर्जा मिळाला. कशाला रुबाब करतोय. कोणत्याही प्रकारचे काही कारण नाही. जे चुकून माकून दाखवायचे ते दाखवले. त्याच्या जोरावर हे मिळाले असे प्रकर्षाने दिसून येते. दापोडी हा शहराचे शेवटचे टोक आहे. तिथे बायपासने दोन वेळेला पाणी देता. आपले अधिकारी मोठमोठे बिल्डर, सोसायट्यांना रहाटणी, पिंपळे गुरव इथे टॅब वरुन पाणी देतात. शहराच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी कसे पोचेल याचा अधिका-यांनी कधी अभ्यास केला आहे का. वीटभट्यांना पाणीपुरवठा करा. अनधिकृत कनेक्शन द्या. आपल्याला लिकेज कधी मिळतच नाहीत. अधिका-यांना सगळ्या गोष्टींची कल्पना आहे. फक्त जाणूनबुजून कोणत्यातरी हव्यासापोटी दूर्लक्ष करायचे. माझ्या प्रभागात ५ लाख लिटरची पाण्याची टाकी बांधून रेडी आहे. पाण्याचा एकही थेंब त्यात नाही. कोणत्याही प्रकारचे नियोजन त्यात नाही. मागील वर्षी नक्की प्रकार काय म्हणून मी लडकत साहेबांशी चर्चा केली होती. त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे प्रशासनाच्या त्रुटी समोर आणल्या होत्या. आपण त्याही सोडवू शकत नाही. कोट्यावधी रुपयांचा महत्वाचा निर्णय होतो. पाणी ही माणसाची महत्वाची निकड आहे. अन्नपाण्यावाचून जीवन नाही त्याच्याकडे दूर्लक्ष करतो. कोणतेही प्लॅनिंग नाही. निश्चिती नाही. इथे आख्खे सभागृह कितीही बोंबलले तरी काहीही फरक होत नाही. प्रशासन निगरगट्ट झाले आहे. याचा निषेध करतो. तांबे साहेब तुम्हाला आवर्जून विनंती करतो, सिटी इंजिनिअर आहेत. त्यांच्याकडे पाणीपुरवठ्याचा चार्ज आहे. टाकी कितीवेळा पाठपुरावा करुन बांधली आहे. त्याला कधी टॅब बसेल, कधी पाणी पडेल. पाणीपुरवठ्यात विस्कळीतपणा आला की दापोडी इथे पाणीपुरवठा नियमित व्हायला ३ दिवस लागतात. ही टाकी भरली तरी बाकीच्यांप्रमाणे ताबडतोब एक टॉयलेट कनेक्शन जोडायचे, मोटर बसवायची त्याला सुद्धा आपल्याला आजपर्यंत मुहूर्त लागतो का. मी ठणकावून सांगतो की, दापोडीमध्ये एक वेळ सुद्धा पाणीपुरवठा होत नाही. प्रत्येक घरात बोंब होते. पाणी आले नाही म्हणून मग अधिका-यांना फोन करायचा. जे.ई. ला कॉन्टॅक्ट केलातर तो कधीही आयुष्यात नागरीकांचा फोन घेत नाही. म्हणून आयुक्त साहेबांना फोन करावा लागतो. जे.ई. नंतर तांबे साहेबांना नंतर तुम्हाला. मी तुम्हाला कितीवेळा एसएमएस केले आहेत. हे अधिकारी फोन घेत नसतील तर आपण त्यांना कशासाठी पोसतोय. त्यांना नागरीकांचे प्रश्न सोडवता येत नसतीलतर त्यांना सस्पेण्ड करा. त्यांना कशासाठी ठेवायचे अशी परिस्थिती आहे. मा.चंद्रकांता सोनकांबळे यांनी सांगितले होते, जे काही निर्णय घेतले ते वरच्या लेवलवर घेतले आहेत. एक

वेळही पाणी नियमित मिळत नाही. निश्चितपणे याची दखल घ्यावी. दापोडीतील पाणीपुरवठा सुरळीत करावा.

मा.आरती चोंधे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दीड तासापासून पाण्यावर चर्चा चालू आहे. हा सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. दुष्काळ होता तेव्हापासून पाण्याचा प्रॉब्लेम होता. धरणे भरली आहेत. पाऊस चांगला झाला आहे. तरीसुद्धा चार दिवसांपासून एकच वेळ पाणी आहे ते असू द्यावे परंतू जास्त प्रेशरने पाणी झाले पाहीजे. सकाळी उठल्यावर अर्धा तासच पाणी येते. गेल्या चार दिवसांपासून पाण्याचा खूप मोठा प्रश्न उत्पन्न झाला आहे. रोज उठून लोकांना काय उत्तर द्यायचे. काही प्रभागांमध्ये पाणीपुरवठा एक वेळ आहे. व्यवस्था होते असे कोण आहे, याचा शोध घ्यावा. आपल्याला नागरीकांना पाणी देण्याची गरज आहे. आपला अधिकार आहे तो दिलाच पाहीजे. आमच्या प्रभागात एक वेळ परंतू प्रेशरने पाणी द्यावे.

मा.शारदा बाबर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मला वाटते, आपण बोलण्यात काही अर्थ नाही. पण आपण बोललो नाहीतर यांना काही समस्या नाही असे यांना वाटेल. माझा एरिया स्लम एरिया असल्यामुळे कुत्री व पाणी एवढेच विषय असतात. माझ्या वॉर्डात मोठ मोठे प्रकल्प काढू शकत नाही. आत्ता सगळे नगरसेवक म्हणतात, दोन वेळ पाणी द्या, एक वेळ पाणी द्या. माझा हे बोलायला का विरोध असावा. कारण आम्हाला हे सांगायची गरज नाही की, एक वेळ पाणी द्या. जेवढे पाणी पाहीजे तेवढे दिलेच पाहीजे. आत्ता हिवाळा आहे. भरपूर पाऊस झाला आहे. दुष्काळ नाही. विषय नाही म्हणून हे विषय येतात का. मागील वेळी डेंग्यूवर तीन तास चर्चा चालू होती. आत्ता पाण्यावर तीन तास चर्चा, अधिकारी काय करतात. त्यांची सुद्धा पगार कपात करा. जशा सोयी देतात, त्याचप्रमाणे पगार द्या म्हणजे बरोबर जागेवर येतील. आत्ता एक नगरसेवक म्हणत होते, ज्येष्ठ नगरसेवक ज्यांचा वट आहे त्यांचीच कामे होतात असे काही होत असेल तर मला माहित नाही. आम्हाला वट म्हणजे काय असतो ते माहित असते तर सर्वांपुढे आम्हाला वट ठेवता येईल. म्हणजे आमची कामे होतील. माझ्या वॉर्डात मोठा प्रकल्प राबवावा असे काही होणार नाही. साध्या सुविधेसाठी ओरडतोय. प्रत्येक वेळी अ प्रभागात जा. जसे काय आम्ही खेळ खेळायला येतो. हे द्या, ते द्या. कोण अधिकारी करतात काय. तर आपण याची नोंद घ्यावी. कृपया बोलायचे म्हणून बोलायचे नसते. कृपया दोन वेळ जसे पाणी होते तसे द्या. लोक वैतागून म्हणतात, एक वेळ द्या. अशी व्यवस्था द्या. दोन वेळ पाणी देण्याची खरी गरज आहे. दोन वेळ पाणी द्यावे. अधिका-यांनी सांगावे त्यानुसार आम्हाला नागरीकांना सांगता येईल. धरणात पाणीच नाही म्हणून हा त्रास भोगावा लागत होता. तुम्ही दोन वेळ पाणी द्यायचा शब्द द्या. म्हणजे मला भांडायची, ओरडायची काही गरज नाही. तरीसुद्धा मी महापौरांना विनंती करते की, याकडे गांभिर्याने पहावे.

मा.अनिता तापकीर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज जो पाण्याचा विषय चालला आहे. रविवारपासून दोन वेळेला पाणी चालू केले आहे. ज्यावेळी दोन वेळेला पाणी चालू केले, त्यादिवसापासून दोन वेळेला पाण्याचे नियोजन व्यवस्थित दिसले नाही. रविवारी ज्यावेळी सकाळी पाणी आले कधी पहाटे ४ ला, कधी ७ ला पाणी येते. तेव्हापासून लोकांना व्यवस्थित

पाणी मिळालेले नाही. ज्यावेळी एक दिवसाआड पाणी येत होते, त्यावेळी व्यवस्थित मिळत होते. पाण्याचे नियोजन दोन वेळेला केल्यानंतर पाणी व्यवस्थित का मिळत नाही. मा.कैलास थोपटे म्हणाले, रहाटणी भागात गेले ७ वर्षापासून मागणी करतोय. एक वेळ सुद्धा पाण्याचा पुरवठा होत नाही. टाकी बांधून दिली पाहीजे. सारखे ओरडून ओरडून सुद्धा नियोजन होत नाही असे का. याचा अधिका-यांनी खुलासा करावा.

मा.निता पाडाळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्तापर्यंत सगळ्यांनी सांगितले, एक वेळ पाणी करा, दोन वेळ पाणी करा. माझ्या प्रभागात दोन वेळ पाणी केले आहे. खूप चांगली गोष्ट आहे. त्यामुळे पाण्याला वॉर्डमध्ये अजिबात प्रेशर नाही. कुठे अर्धा तास पाणी येते, कुठे एक तास पाणी येते. १५/२० वर्षापूर्वी पाण्याच्या लाईन टाकल्या आहेत. त्यावेळच्या लोकसंख्येनुसारच टाकल्या होत्या. त्या लाईन्समधून पाणीपुरवठा होतो. आत्ता लोकसंख्या वाढली आहे. त्यांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. लाईन जुन्या असल्यामुळे गंजलेल्या आहेत, होल पडले आहे. पाण्यात घाण जाते. पाण्याला घाण वास येतो. त्यामुळे कोकणेनगर, नढे नगर भागात अर्धातास नळ रिकामाच ठेवावा लागतो. त्यामुळे पाणी वाया जाते. ड्रेनेज मिक्स पाणी येते. आपण प्रत्येक वॉर्डसाठी जे बजेट देतो. माझ्या वॉर्डातल्या एक/दोन लाईन्स बदलायच्या आहेत. बजेट वाढवून दिले पाहीजे. पाईपची काहीतरी गॅरंटी दिली पाहीजे. किमान १५/२० कॉलन्यांच्या पाईपलाईन बदली झाल्या पाहीजेत. लिकेजमुळे पाणी वाया जाते. त्यामुळे कधीच २४ बाय ७ करु शकत नाही. पहिले लिकेज शोधा, नंतर पाण्याचे बघा एवढेच मला सांगायचे आहे. तुम्ही मला बोलू दिल्याबद्दल धन्यवाद.

मा.शांताराम भालेकर - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ख-या अर्थाने शहरामध्ये दोन वेळेला पाणी देण्याच्या नाटकामुळे पाण्याची परिस्थिती पूर्णपणे विस्कळित झाली आहे. माझी आयुक्त साहेब आपल्याला व संपूर्ण पाणीपुरवठा विभागाच्या अधिका-यांना विनंती आहे की, शहरात एक वेळ व प्रेशरने पाणी द्यावे. नागरीकांच्या दृष्टिकोणातून अतिशय महत्वाचा विषय आहे. या विषयावर महिला भगिनी जास्त बोलत होत्या. कारण महिलांनाच पाण्याचा प्रश्न सोडवावा लागतो. महापौर साहेब देखील महिला सदस्यांना जास्त प्राधान्य देत होत्या. पाणीपुरवठ्याच्या संबंधित अधिका-यांना विनंती आहे, कृपया आपण आत्ता डेंग्यूच्या माध्यमातून जसा दंड करता, तसा दंड आकारा. पाणी गळती थांबवावी. झोपडपट्टी भागात एवढ्या प्रमाणात पाणी वाया जाते त्याला हिशोब नाही. पाणीगळती थांबवलीतर शहरात पाणीपुरवठा व्यवस्थित होईल. तुम्ही काहीतरी चांगल्या गोष्टी अधिका-यांपर्यंत पोहोचवा. अनेक ठिकाणी लिकेजेस आहेत. योग्य गोष्टींचा अवलंब करुन लोकांना प्रमाण सांगून कशाप्रकारे गळती थांबवता येईल त्यासाठी प्रयत्न करा. गावे समाविष्ट होऊन १७ वर्षे झालीत. ओपन गटर्स आहेत. गटर्स तुंबले जातात. बंद गटर योजना केली पाहीजे. गटर्स बंद केले पाहीजेत. ग्रामिण भागात रस्ते नाहीत. ग्रामिण भागात प्रामुख्याने खूप बेकार अवस्था आहे. बजेट करताना संबंधित अधिका-यांना स्थापत्य विभाग असेल, विद्युत विभाग असेल, उद्यान विभाग असेल, पाणीपुरवठा विभाग असेल, ड्रेनेज विभाग असेल, नगरसेवकांनी लक्ष दिले नाहीतर ती आपली जबाबदारी आहे. शहरात योग्य व्यवस्था करायचे काम आपले आहे. नगरसेवकांनी

सांगितले पाहीजे नंतर आपण केले पाहिजे. ही गोष्ट सुद्धा करायची. प्रोजेक्ट राबवायची बजेटमध्ये तरतूदच नसते. प्रोजेक्टसाठी तरतूद नसेलतर ते राबविता येत नाहीत. अधिकारी म्हणून आपल्याला कळत असेल तर आपण सुद्धा मार्गदर्शन करा. शहर अभियंतांच्या दृष्टिकोणातून विचार करा. आम्हाला चांगले बोलता येते, तसे वाईट सुद्धा बोलता येते. ज्या हिशोबाने पगार घेता त्या हिशोबात कामे करा. शेळी, कुत्री, डुकरी जनावरे, आपले काही लोक प्रभागात आहेत. सातत्याने नेहमी सांगतो, निगडी पूलावर कायम जनावरे नेली जातात. जनावरे हुसकावत असतात. अनेक लोकांचे अपघात होतात. सातत्याने आमच्यासारखे नगरसेवक बोंब मारतात. तरीसुद्धा यावर पर्याय निघत नाही. याची काळजी घ्या. आपण जशी डुकरे मारतो, कोंबड्या मारतो, तशी कुत्री मारायला काय अडचण आहे. त्यांनाही मारुन टाका. कसली मनेका गांधी, कसला कायदा, मेंढ्या मारतो ते चालते. पत्रकारांच्यासमोर सांगतो. निश्चितपणे पत्रकार रात्री-अपरात्री जाताना कुत्री त्यांना सुद्धा सोडत नाहीत. ते ही बातमी देणार नाहीत. ते आपल्याला मदत करणार. भारत देशाने आपल्याला पुरस्कार दिला आहे. याची निश्चितपणे काळजी घ्या. पत्रकार आपल्या पाठिशी आहेत. जास्त न बोलता आपण मला बोलायची संधी दिलीत त्याबद्दल मनापासून धन्यवाद!

मा.राहूल जाधव - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आमच्या प्रभागातील, ग्रामिण भागातील विषय आहे. ग्रामिण भागात पाण्याची तर ओरड आहेच. परंतू त्याचबरोबर मुलभूत सुविधा पिंपरी चिंचवड महापालिकेने पुरविल्या पाहीजेत त्या सुविधा आमच्या भागात पुरविल्या नाहीत. आज सांगायला खूप मोठे दूर्देव वाटते,आपल्या पिंपरी चिंचवड मनपाचे वरिष्ठ अधिकारी सन्मा.गावडे साहेब स्वतः माझ्या प्रभागात आग लागली म्हणून आले होते. त्यांनी डायसवर खुलासा करावा,त्यांना काय अनुभवायला मिळाले ते त्यांनी सांगितले तर बरे होईल. आपण संमती द्यावी. त्यांना विचारा. प्र.क्र.५ मध्ये आग लागल्यानंतर त्यांना कुदळवाडीत काय अनुभव आला. गेले अडीच वर्षे हेच बोलतो आहोत. आम्हाला जास्त निधी दिलातर आमच्या प्रभागात समाविष्ट गावांचा विकास होईल. परंतू त्या पद्धतीने आम्हाला सभागृहात बोलावे लागते. बोलणे तसेच आरोपही कागदावर राहतात. आमच्या प्रभागात कोणत्याही पद्धतीने कसाही निधी खर्च होत नाही. मी गेल्यावेळी सभागृहात बोलताना एवढेच बोललो होतो, तेवढे कररुपाने निधी माझ्या प्रभागातून जमा करत असालतर त्याच्यापैकी ५० टक्के जरी खर्च केलेतरीसुद्धा माझ्या वॉर्डात मॉल होईल. हे मी आवर्जून इथे बोललो होतो. गावडे साहेबांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, तुमच्या भागात खूप विकास व्हायचा राहीला आहे. आपण देखील ग्रामिण भागातील आहात. माझ्या प्रभागात आपले पाहुणे आहेत त्यामुळे पाण्याची समस्या बापूंनी म्हटल्याप्रमाणे एक वेळ पाणी येऊ द्या. पण प्रेशरने पाणी येऊ द्या. जिथे पाण्याची गळती आहे, त्याचा सुद्धा विचार केला पाहीजे. नदीकडेला ज्या भंगार वस्तू आहेत, केमिकल कंपन्या आहेत, त्यांनी त्यांच्या कामासाठी ईलिगल कनेक्शन्स् घेतले आहेत ते सुद्धा बंद केले पाहीजेत. इंद्रायणी नदीमध्ये थेट पाणी जाते. परंतू ईलिगल कनेक्शन्स आहेत ते चालू आहेत ते देखील आपण पाणीपुरवठा विभागात पहायला पाहिजेत. ग्रामिण भागाचा विचार करतो. मला बजेटवर बोलायला २ वेळा संधी मिळाली पण त्यापद्धतीने बजेट दिले ते एवढे भरपूर नव्हते तुमच्या हाताने आमच्या भागाचा विकास व्हावा. श्रीगुरुंना, दत्तगुरुंना प्रार्थना करुन विनंती

करतो, आमच्या भागाला जास्तीत जास्त निधी देऊन शहराचा विकास करावा अशी विनंती करतो.

मा.गिता मंचरकर-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,माझ्या वॉर्ड क्र.४१मध्ये महापालिकेची शाळा आहे, तिथे महापालिकेचे पाणी येते ते अजिबात स्वच्छ येत नाही. त्या पाण्याचे मी फोटो काढले आहेत. मला त्या पाण्यात किडे व आळ्या दिसल्या. महापालिकेत मुळात आरोग्याचा प्रश्न आहे, तिथे लक्ष द्यावे अशी विनंती करते.

मा.आर.एस.कुमार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला समजत नाही. एक वेळ पाणी करा, दोन वेळ पाणी करा यावर चर्चा चालू आहे. ६ वर्षांपूर्वी त्यावेळचे आयुक्त बंड साहेबांनी मिटर बसवण्याचा विषय करताना सांगितले होते, मिटर लावून घ्या, आम्ही २४ तास पाणी देणार आहोत. मिटर लावून घेतले पण आम्हाला त्यात चूका दिसल्या चोवीस तास पाणी देऊ शकतो असे त्यावेळी मान्य केले होते. मग पाणी कुठे गेले. आपण प्रेस कॉन्फरन्स घेतली होती. फोटो सहित चार कॉलमची बातमी आली होती. वोट मागायला मतदारांकडे गेलो की ते म्हणतात, २४ तास पाणी देणार होता. जाहीरात कटींग करुन ठेवतात व आम्हाला दाखवतात. एका आयएएस अधिका-याने आम्हाला चक्क फसवले असे सांगायला पाहीजे. माझ्या वॉर्डात ३ वर्षांपूर्वी २०११-१२ मध्ये २४ बाय ७ योजना राबविणार असे सांगितले होते. कोणी हायजॅक केले माहित नाही. प्रभागात दोन वॉर्ड झाले. २४ तास पाणी मिळणार असे अधिका-यांनी सांगितले होते. दोन वर्षे झालीत पाणी नाही. लिक कनेक्शनसाठी दीड कोटी घालवले. तुमच्या शब्दाला व्हॅल्यू आहे का नाही ते सांगा. आज लोकांना उत्तर काय देणार? भामाआस्केड याचे पाणी कुठे गेले? पवना धरणातून १०० एमएलटी पाणी मिळाले. टॅक्स वाढला, घरे वाढली, लोकसंख्या वाढली. अतिरिक्त पाणी मिळण्यासाठी अधिका-यांनी काय प्रयत्न केले. १९९८ मध्ये या सभागृहात ठराव होतो. आंध्रा-मावळ मधून ५०० एमएलटी द्यायला तयार होते. त्यावेळी १००/- कोटी डिपॉझिट घेणार होते. त्यावेळी हा ठराव फेटाळला होता. त्यावेळी हे १०० कोटी दिले असतेतर आज पवना धरणातून जेवढे पाहीजे तेवढे पाणी मिळाले असते. त्याकाळातील अधिका-यांना वाटले याचे क्रेडिट राज्य शासनाला मिळणार. म्हणून ठराव फेटाळला. आज पाण्यासाठी किती ओरड होते. तरीसुद्धा १०० कोटी डिपॉझिट देण्याचा ठराव फेटाळला. आज ते आपल्याला १०० एमएलटी सुद्धा द्यायला तयार नाहीत. सरकारची ही ड्युटी आहे. कुठेतरी पाणी जास्त आणले गेले पाहीजे होते. एकिकडे बांधकामांना बिल्डींग परमिशन देतो. हजारो, लाखो घरे बांधतो. पाणी मात्र तेवढेच कसे पुरणार? एकतर बिल्डींग परमिशन देता ते काही काळ बंद करा. आंध्रा-मावळ,भामा आस्केड मधून पाणी येणार असे दोन वर्षांपूर्वीच सांगितले होते. आज हे पाणी कुठे आहे. जास्त पाणी आणायला पाहीजे होते. कमिशनर मंत्रालयात बैठकीत असतात. महापौर साहेब व आयुक्त साहेब यांनी लवकरात लवकर प्रयत्न करुन आंध्र-भामा आस्केड मधून पाणी आणलेतर प्रश्न सुटेल. येथे प्रोजेक्ट केला गेलातर माहिती पडते की, वॉर्डात किती पाणी पोचते, किती वाया जाते. ज्यांना स्काडा माहित आहे त्यांनी चेक करा. ५ वर्षांत ठरवले होते. आपली लोकसंख्या वाढली आहे, तेवढे सुद्धा पाणी मिळत नाही. २५/२६ एमएलटी पाणी देतो. ३० एमएलटी पाणी देत नाही. फिल्ट्रेशन एकिकडे, डिस्ट्रिब्युशन एकिकडे.

माझ्या भागात पाण्याच्या डिस्ट्रिब्युशनमध्ये श्री.तळवलकर चांगले काम करतात. ते म्हणतात, डिस्ट्रिब्युशनमध्ये यांना सांगा. ते म्हणतात, फिल्ट्रेशन व डिस्ट्रिब्युशन दोन माणसांकडे न देता एकाच व्यक्तीकडे द्या नाहीतर प्रॉब्लेम होणार. विद्युत व पाणीपुरवठा या दोन्ही विभागांचे काम एकाच व्यक्तीकडे पाहीजे. त्यांच्याकडेच डिस्ट्रिब्युशन पाहीजे. आपल्याला काही माहित पडणार नाही. आत्ता दोन वेळ पाणी, एक वेळ पाणी असे म्हणतो. आम्ही पण पाणी घेतले मग परत एका वेळेला पाणी कसे यायचे. ५ वर्षांत जेवढे नॉर्मस् फिक्स केले तेवढे तरी मिळाले पाहीजेत.

मा.नारायण बहिरवाडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रत्येक स्थानिक नागरीकाला पाणी, वीज, आरोग्य व प्राथमिक शिक्षण या मुलभूत सुविधा देणे महापालिकेचे कर्तव्य आहे. पाणी ही जीवनावश्यक बाब आहे आणि त्याची गरज शहरातील प्रत्येक नागरीकाला लागते. पाणी देणे महापालिकेचे काम आहे यात दुमत असण्याचे कारण नाही. सभागृहामध्ये जवळजवळ दोन तास यावरच चर्चा चालू आहे. याचा अर्थ संपूर्ण शहरामध्ये पाण्याचा प्रॉब्लेम आहे. मोशीतून मा.अजित गव्हाणे, सांगवीतून मा.अतुल शितोळे, यमुननगरमधून मा.सुलभा ऊबाळे बोलल्या. म्हणजे शहरातील प्रत्येक भागातील नगरसेवकाने पाण्यासंदर्भात तक्रार इथे मांडली आहे. मध्यंतरी पावसाने ताण दिल्यावर धरणातील पाण्याचा साठा कमी झाला म्हणून दोन वेळ पाण्याऐवजी एक वेळ पाणी द्यायला सुरुवात केली होती. त्याचबरोबर शहरातील खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणारे लोक होते त्यांनाही पाणी द्यायला बंद केले होते. आमच्याकडे शाहूनगर, संभाजीनगरमध्ये १० फ्लॅटच्या सोसायटीपासून ७० ते ८० फ्लॅटच्या गृहरचना संस्था आहेत. मोठ्या सोसायट्यांना पाणीपुरवठा होत नसेल तर महापालिकेचा टँकर कधी मिळतो, कधी मिळत नाही. परंतू सोसायटीधारक खाजगी टँकरवाल्यांना पैसे देऊन पाण्याचा पुरवठा करत होते. ते देखील आपण बंद केले होते. १० फ्लॅटच्या सोसायटीला एक इंची कनेक्शन, २० फ्लॅट असतील तर २ इंची कनेक्शन अशी संख्या शाहूनगर, संभाजीनगरमधील नागरीकांनी सांगितले. ते मला देखील पटले. प्रत्येक कुटूंबाला एक हजार लिटर पाणी द्यायला सांगितले आहे. जेव्हा पाणी येत नाही, पुरवठा व्यवस्थित होत नाही, फोन केलातर तुमचे जे.ई. जाधव हे खूप हुशार आहेत ते त्यावेळी म्हटले, अमुक अमुक सोसायटीची तक्रार आहे. पाण्याची कमतरता असेल तर पाणी मिळत नसेलतरच नागरीक तक्रार करतात. आमच्याकडे सगळी कामगार वस्ती आहे. ९० टक्के कामगार इथे राहतात. मी वारंवार हेच सांगितले, ज्यावेळी पाण्याची अडचण असेल त्यावेळीच नागरीक तक्रार करतो. बरेच वेळा पिरजादे यांना मी बोलत असतो, पाणीपुरवठा सुरळीत आहे. ज्यावेळी तक्रार केली, पाण्याचा प्रॉब्लेम होतो आहे. तो जाधव आम्हाला उलट शिकवतो, नाही साहेब, पाणी नीट येते आहे. नागरीकांना आम्हाला फोन करायला वेड लागले आहे का. तो रात्री येणार, मिटर लावणार. दहा हजार लिटर पाणी पडते. १५ फ्लॅटची सोसायची असेल तर १५,००० लिटर पाणी तिथे पडेल, यासाठी देखील आपण काहीतरी योजना करायला हवी आहे. ज्यावेळी दोन वेळ पाणी होते त्यावेळी निश्चितपणे प्रॉब्लेम होता. एक वेळ पाणी सुरु केले त्यावेळी शाहूनगरमध्ये पाण्याची तक्रार नव्हती. जेव्हापासून दोन वेळ पाणी केले, तक्रारी यायला सुरुवात झाली आहे. आजूबाजुच्या परिसरातून तक्रारी यायला सुरुवात झाली आहे माझी आपल्याला विनंती आहे

की, मघाशी सुलभाताईंनी सांगितले. एका सोसायटीला १०,००० लिटर पाणी देणार असालतर सकाळी ५,००० लिटर व संध्याकाळी ५,००० लिटर पाणी दिले तर उपयोग होत नाही. एका वेळेला भरपूर दिलेतर प्रेशरने द्या. खालील संप भरले जातात तोवर लॉक करतो मग सगळ्या नागरीकांना पाणी मिळते. या शहरात काही खाजगी टँकर आहेत. खाजगी टँकरला फुकट पाणी देत नाही. त्यांच्यावर कोणत्या प्रकारचे उपकार करत नाही. त्यांना कमर्शियल रेटने पाणी देतो. त्याची रिक्वायरमेंट दीड लाख लिटर असेल तर त्यांना एक लाख लिटर देतो. आज शहरात मोठ मोठे मॉल्स् आहेत डबल ट्रीसारखी फाईव्ह स्टार हॉटेल्स आहेत. हे शहर आता महानगर होऊ लागले आहे. चांगल्या पद्धतीचे मॉलस्, मोठमोठे शॉपिंग सेंटर्स असलेल्या सोसायट्यांना पाणीपुरवठा करु शकत नाही. अशा वेळेला खाजगी टँकरधारकांची मदत घ्यायला पाहीजे. जे लोक त्यांच्याकडून निदान पैसे घेऊन पाणी घेतात, त्यांना पाणी न देण्याचे कारण काय ते सांगा. ज्यावेळी मुबलक पाणी होते मोठमोठ्या सोसायट्या, हॉटेलवाले यांना खाजगी टँकर वाल्यांनी त्यांना पाणी दिलेतर काय बिघडले. मॉलमध्ये, हॉटेलमध्ये कोण नागरीक जातात ही मंडळी शहरावालेच आहेत. मला आपल्याला विनंती करायची आहे, आपण याठिकाणी त्यांना पाणी द्या. शहराबाहेर टँकर गेले नाही पाहीजेत. निश्चितपणे तक्रारी कमी होतील.

मा.मंगलाताई कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला वाटते सगळ्यांनी लडकत साहेबांना इथून उठून जाताना पाहिले आहे. त्यांनाही कळाले आहे आपल्याला खुलासा करावा लागणार आहे. डॉ.श्रीकर परदेशी आयुक्त असताना ऑटोक्लस्टरला त्यांनी मिटींग घेतली होती. सगळे नगरसेवक बोलले मान्य आहे. म्हणून यावर मी काहीही बोलणार नाही. परत परत तेच तेच बोलून अधिका-यांचा व नगरसेवकांचा कोणाचाच वेळ मला वाया घालवायचा नाही. प्रत्येक जण तेच बोलतोय. शेवटची ओळ काय पाणी पुरेसे मिळाले पाहीजे. २४ बाय ७ अशी पाण्याची कमिटमेंट होती. त्यासाठी मिटींगला मी व सगळेच बरोबर होतो. प्रेझेंटेशनसाठी त्यावेळी तुम्ही कमिटमेंट केली होती. ऑटोक्लस्टर इथे डॉ.श्रीकर परदेशी असताना मिटींग घेतली होती, तेव्हा सांगितले होते, टप्याटप्याने २४ बाय ७ पाणी देण्यासाठी आम्ही बांधिल आहोत. तुम्हाला अधिका-यांना काय नाही दिले. जसे जसे सांगितले, तसे दिले आहे. स्काडासाठी अमुक पाहिजे. लाईट घ्यायला पंपिंग साठी वेगळे टनेल पाहीजे, पाण्यावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही पाहीजेत. आम्ही कधी विरोध केला आहे का. सदस्यांनी कधी विरोध केला आहे का. परंतू आम्हाला सांगा, आज अशी परिस्थिती आहे. आख्खे सभागृह बोलते आहे. निश्चित परिस्थिती २४ तास तर सोडाच. पण तुम्ही सांगितले होते. कमिटमेंट दिली होती. स्काडा प्रणाली आल्यानंतर टप्याटप्याने कोणाला किती पाणी देणार, कसे काय करणार, कोणाला काहीही देणेघेणे नाही. तुम्ही किती पाणी उचलता, किती गळती आहे याचे कोणाला काही देणे घेणे नाही. तुम्ही जे जे मागितले ते ते दिले आहे. मग अजून काही अपेक्षा आहे ते अजून कळू द्या. म्हणजे पाणीपुरवठा पूर्णपणे देऊ याचा खुलासा तुम्ही केला पाहीजे माझे बोलणे झाल्यानंतर २४ तास पाणी कधी देणार, देणार नसाल तर आमची दिशाभूल का केली याचा खुलासा पाहीजे आहे. कारण तुम्ही आमची दिशाभूल केली आहे. कारण तुम्ही आम्हाला स्पष्ट सांगितले होते. या अडीच वर्षातली अडीच वर्षे संपली आहेत. पूर्णपणे शंभर टक्के पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा झाला असेल तर २४ तास अर्ध्या शहराला करु असे त्यावेळी

म्हटले होते. ज्या-ज्या भागात देता येईल अशा ठिकाणी पोचणार. कोणीही मोठा नागरीक असे काही नसते. असे काही कुठे चालत नाही. थोपटे दादांनी आधी विचारले होते, मला पाणी प्रश्नावर बोलायचे आहे. मान्य आहे सगळीकडे शहरात अडचणी आहेत. परंतू अधिका-यांना किती दिवस संधी दिली होती. एक वेळ पाणी चालू होते तेच प्रेशरने द्यावे. दोन/चार सदस्यांनी म्हटले दोन वेळ पाणी द्या म्हणून दोन वेळ पाणी करायची कल्पना सूचली. शहर अभियंता कांबळे साहेब म्हणतात, टप्याटप्याने करतो. मला आत्ता सांगायला सांगू नका. तुम्हाला असे त्यादिवशी सांगितले होते. कमिशनरांच्या मिटींगच्या वेळी सांगितले होते, पाण्याची जिथे तिथे ओरड नाही. सगळ्या अधिका-यांना मिटींग घेऊन सांगा. या प्रश्नावर परत चर्चा करायची वेळ आली नाही पाहीजे. कोणाची तक्रार आहे, कोणत्या भागातली तक्रार आहे, ती तक्रार मिटली गेली पाहीजे. मी पहिल्यांदा सांगितले, मला संध्याकाळी ५ वा. पाणी आल्यावर सकाळी ९ वा. पर्यंत पाणी यायचेय. आत्ता एक वेळ पाणी येते. कुठेतरी हे मिटले गेले पाहीजे. तुमच्यासारखे हुशार अधिकारी असताना तीन/तीन तास तिथे मिटींग, तिथे गोधळ, इथे मिटींग इथे गोंधळ, हे कुठेतरी मिटले गेले पाहीजे. आम्ही तुम्हाला कल्पना दिली होती, ज्या-ज्या नगरसेवकांची ओरड आहे, पहिले तिथले प्रश्न सोडवा नंतर टप्याटप्याने दोन वेळ पाणी करा. जिथे मागणी असेल तिथे दोन/चार लोकांची मागणी असेल तिथेच ट्रायल बेसिसवर करायचे आहे. सगळेच नगरसेवक आता यावर बोलायला लागले. मा.किरण मोटे यांनी विषय सुरु करुन दिला. चालू दे. गेले निघून. ही मजा आहे का. दोन/दोन तास याच विषयावर सभागृह चालू द्या नगरसेवकांनी सिरियसली बोलले पाहीजे. ठामपणे, नीट उत्तरे मागितली गेली पाहीजेत. त्यांना कळते, अर्ध्या सभागृहात का नाही त्यादिवशी कमिटमेंट झाली होती, दोन वेळ पाणीपुरवठा द्या. नंतर कमीत कमी पाच/दहा दिवस जाणार आहेत. यांच्यावर कसा धाक राहील व कंट्रोल राहील. नुसतेच बोलायचे. लडकत साहेब तुम्ही पहिल्यांदा खुलासा करा. अडीच वर्षे पूर्ण होतात आम्हाला सगळ्यांना सांगा. आम्ही नगरसेवक आहोत. आम्हाला सांगितले होते, २४ बाय सात येत्या अडीच वर्षात देता येईल. तुम्हाला एक वेळ सुद्धा पाणी देता येत नाही मग कशी काय कमिटमेंट केलीत. सगळ्या नगरसेवकांना तोंडघशी पाडले असे म्हणायचे तुम्ही मन लावून काम करताय. तुम्हाला बोलताना चांगले वाटते असे नाही. तुम्ही रात्र दिवस बघत नाही. सुट्टीचा दिवस बघत नाही. रावेतला असता, पंप हाऊसवर असता. कामाच्या व्यतिरिक्त शहरासाठी काम करताय. पण आऊटपूट मिळाले पाहीजे. एकदा सभागृहाला नीट सांगा. कोणी डुकरांचा विषय घेतो, कोणी ड्रेनेजलाईनचा विषय घेतो, कोणी कुत्र्यांचा विषय घेतो, सभा भरकटत जाते. एक विषय घ्यायचा व त्यावर सभा भरकटवायची. असे करुन चालणार नाही. सगळ्यांना बोलायला द्यायचे म्हणून प्रत्येकाने हात वर करायचे. त्यापेक्षा आधी कांबळे साहेबांनी,लडकत साहेबांनी खुलासा केला असता तर एवढे बोलावे लागले नसते. ज्यांनी बोलायला द्या म्हणून सांगितले ते निघून गेले मग राहीले काय. म्हणून या मिटींगआधी पार्टी मिटींग होते. महापौर साहेब, आपण सुद्धा दक्षता घेतली पाहीजे. सभागृह चालवत असताना कोणी दिशाभूल तर करत नाही ना हे सुद्धा लक्षात घेतले पाहीजे माझी पाणीपुरवठ्याच्या सगळया अधिका-यांना नम्र विनंती आहे, सभागृहामध्ये आम्ही परत परत बोलणार नाही. आम्हाला व्यवस्थितरित्या पाणी मिळाले पाहीजे. हे आमचे काम नाही. तुम्हाला जे पाहीजे ते देणे, पुरवणे हे आमचे काम आहे. पाणी चांगल्या प्रकारे मिळणार का नाही. चांगले पगार घेता,

खुर्चीवर बसता मग अधिका-यांनी व्यवस्थितरित्या काम केले गेले पाहीजे. पाणी वाटप नीट मिळाले पाहीजे. यापुढे पुन्हा या सभागृहामध्ये पाणी प्रश्नावर चर्चा झालीतर त्या अधिका-यांना सस्पेण्ड केल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही. मग तो घरदार सोडून पाणीपुरवठ्याच्या टाकीवर बसला तरी चालेल. या विषयावर नीट मार्ग मिळाला नाहीतर, त्याला सस्पेण्ड करायची जबाबदारी आयुक्त तुमची असेल. आम्हाला काही काम नाही का. आरोग्याचा प्रश्न घेतलातर अजून तीन तास सभा चालेल. मा.अजितदादा हॅण्ड ग्लोव्हज् घालून कचरा उचलतात पंतप्रधान मोदी यांनी स्वच्छता अभियान राबविले आहे. दुस-या दिवशी शहरात काय परिस्थिती दिसते. हे बघायची जबाबदारी आमची आहे का. आरोग्यचे किती कर्मचारी आहेत. त्यांची ही जबाबदारी नाही का. तुम्ही स्वतः तिथे परत जाऊन बघा. आत्ता सुद्धा तिथे तेवढाच कचरा असेल. पगार कोण घेतो. त्याला दंड करा. हातगाडीवाला पैसा कमवणार. तरीसुद्धा शिस्तीने, व्यवस्थित काम केले पाहीजे. तो पैसे कमवतोय, आम्ही हाताने कचरा उचलतोय ही कोणती पद्धत आहे. दुस-या दिवशी तिथून जवळून गेल्यानंतर गावडे साहेबांना मी लगेच फोन केला, काल कचरा काढला, आज त्या भक्ती शक्तीची कंडीशन बघा. मला विषयांतर करायचे नाही. पाणीपुरवठ्याबाबतीत झाले आहे तसे सर्व विभागांच्या बाबतीत आहे. अधिका-यांने काम व्यवस्थितरित्या, जबाबदारीने पार पाडलेतर सभागृह कशाला भरक्टत जाईल. मी बोलले नाही म्हणजे मला या विषयाचे गांभिर्य नाही का, म्हणून बोलायचे असे कुठे असते. आजपर्यंत सभागृहाचे कामकाज असे कधी चालले नाही आम्हालाही वाटते याची जाण आहे. अधिका-यांची जास्तीत जास्त जबाबदारी आहे. ज्या सदस्यांना पाणीपुरवठ्याबाबतीत अडचणी आहेत त्यांचा विरोध होतो. त्यांच्या अडचणी पहिल्यांदा सोडवाव्यात. कोणत्या भागात अडचणी आहेत. एखाद्या दुस-या पॉईंटला अडचण असते, ती पहिल्यांदा सोडवावी. मनपाचे टँकर असून खाजगी टँकरने पाणी देतो. कोण टँकर माफिया होता आम्हालापण माहित आहे. ज्या ठिकाणी पाणीपुरवठा होण्यात अडचण येत असेल, उंचसखल भाग असेल तिथे आपल्या टँकरनेही पाणी द्या. लोकांना पाणी मिळालेच पाहीजे. एका सदस्यांनी मुद्दा मांडला होता. पाहीजे त्यांना पाणी द्या. शहरात आलेला माणूस पाणी न पिताच जाणार आहे. नवा राजा, नवी खुर्ची, नवीन भिडू अशी परिस्थिती आहे. नवीन कमिशनर आले की दुसरा निर्णय. एकदा ठरल्यानुसार सभागृहाने घेतलेले निर्णय असतात, ते पुढे फॉलो केले पाहीजेत. त्या दृष्टीकोणातून कामकाज झाले पाहीजे असे वाटते. किती दिवसांत पाण्याचा प्रश्न मिटेल ते सांगावे. नगरसेवकांचे काय म्हणणे आहे, पाणी पुरेसे मिळाले पाहीजे. सभागृहात कोणी सांगणार नाही, एक वेळ पाणी द्या, दोन वेळ पाणी द्या. महापौरांना किंवा सदस्यांना यात अडकवू नका. होणार नसेलतर कशाला सांगायचे, दोन वेळ पाणी द्या. पत्रकारांना सांगायचे, मग परत म्हणायचे किती दिवस चालायचे. सगळ्या गोष्टी यात संपल्या पाहीजेत. याचा खुलासा करावा अशी विनंती करते.

मा.लडकत (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मी सर्वप्रथम या सभागृहाचे आभार व्यक्त करतो या सभागृहाने पाणीपुरवठा विभागाला ज्या-ज्या वेळी अडचण आली, त्या त्या वेळी मदत केली आहे. स्काडा प्रणाली या सभागृहाने मंजूर केली, त्यानंतर आपण काम सुरु केले. आत्ता सांगितले, २४ बाय ७ पाणीपुरवठा, ज्यावेळी आपण याबद्दल विचार करत होतो, त्यावेळी मा.मंगलाताई कदम असतील, मा.योगेश बहल

असतील, बाकी ज्येष्ठ नगरसेवक त्यावेळी होते. हैद्राबादमध्ये अधिका-यांचे ट्रेनिंग झाले होते. आपली सध्याची सिस्टीम, आपला रोजचा पाणीपुरवठा व शहराची मागणी यानुसार २४ बाय ७ पाणीपुरवठा करायला शक्य होईल का नाही याचा अभ्यास केला होता. यात सर्वप्रथम क्रिटीकल भाग यमुनानगर घेतला. इथे तांत्रिक अडचणी खूप होत्या म्हणून हा भाग निवडला होता. या भागामध्ये २४ तास पाणीपुरवठा देता आलातर शहरातील इतर भागांमध्येही देता येईल. म्हणून हा भाग निवडला होता. फक्त २४ तास पाणीपुरवठा म्हणजे फक्त पाईपलाईन बदलून होणार नाही. शहराचे नेटवर्क, शहराची गरज याचा अभ्यास करणे गरजेचे होते म्हणून झोन करुन आवश्यक बदल केले. इतर शहरांत औरंगाबाद, म्हैसूर, हुबळी, धारवाड इथे जरी प्रयत्न झाला असला तरी.केलेतरी इथे प्रयत्न झाला होता. २००८ साली औरंगाबादचा फंड सँक्शन होऊन सुरुवात झाली होती. हुबळी, धारवाड यांची गाडी पुढे गेली नाही. हे एखाद्या अधिकारी, पदाधिका-याच्या हातात नसते. सगळ्यांची प्रत्येकाची यासाठी गरज आहे. यमुनानगरच्या बाबतीत लक्षात आले की, ठराविक पाईपलाईन बदलून २४ तास पाणीपुरवठा करता येईल. या अभ्यासाचा उपयोग सिस्टीम करण्यात झालातर ४० टक्के भागाचा विचार केलातर त्यावेळी पायलेट झोनचा सिटीत उपयोग झाला. मिनिस्टरी ऑफ होम यांना रिपोर्ट दिला होता. त्यावेळी जे आयटम घेतले ते मंजूर करुन दिले आहेत. ज्या अडचणी येतात, त्या शहरातील प्रश्न सोडवण्यासाठी खूप महत्वाच्या असतात. स्काडा प्रणालीबद्दल स्टँडींगमध्ये, जी.बी.मध्ये वारंवार चर्चा होत असते. माझी सगळ्यांना नम्र विनंती आहे की, स्काडा प्रणालीचे जे फायदे आहेत, ते फक्त लडकत साहेब सोडवून देत नाहीत. मी विनंती करतो की, सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक, जे अभ्यासू नगरसेवक आहेत, पत्रकार, नागरीक देखील आहेत. एकवेळ प्लॅण्टवर बसून स्काडा प्रणाली समजून घेऊ. बाहेरील तज्ञांना सुद्धा घेऊन या. त्रुटिंवर समोरासमोर चर्चा करु. प्रत्येक वेळी सभागृहात स्काडा प्रणाली चुकीची आहे असे होत नसते. तिथे मन लावून काम केले आहे. इंजिनिअर यांच्या मदतीने काम केले. भारतात आपली ही प्रणाली चांगली म्हणतात. मग आपल्याला असे का वाटतेय. त्यातील त्रुटी समजून घ्या. नंतर दूर करा. लडकत साहेबांकडील जबाबदारी शंभर टक्के काढून टाका.

मा.मंगलाताई कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता प्रश्न विचारला होता. मी जे म्हटले ते दिले आहे. सगळे नगरसेवक, मा.अजितदादा तिथे आले होते. आम्ही तुम्हाला सांगतोय, आम्हाला फक्त पाणी कसे देणार ते सांगा. जे मागितले ते आम्ही ते देतोय. आम्ही तुम्हाला नावे ठेवली. १० बोटातल्या एका बोटाने नाव ठेवले तर त्याला उत्तर द्या. आम्ही काही करु शकत नाही किंवा देऊ शकत नाही याचा खुलासा करा. बाकीचे काही सांगू नका.

मा.लडकत (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, ज्यावेळी स्काडा प्रणाली पूर्ण झाली, ८५ पैकी ६० टाक्या पूर्ण केल्या. जेएनएनयूआरएमची माहिती आपल्याला नव्हती. विषय दोन वेळा पेंडींग होता. किती वेळा फॉलोअप घेतला. यावर किती वेळा चर्चा झाली. विषय कॅन्सल करुन पुन्हा टेंडर काढले. यात दोन वर्षांचा कालावधी गेला. हे काम 2 वर्षापूर्वी झाले असतेतर सगळे काम पूर्ण झाले असते

मा.प्रशांत शितोळे-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आम्हाला आऊट डेट द्या. स्टँडींगने केले ते चांगले का योग्य वाटले यावर नंतर चर्चा करा. विषय थांबवू नका. तुम्ही २ वर्षे काय करत होता. 2 वर्षांत शहराचे २४ बाय ७ चे नियोजन केले आहे त्याचे सांगा. ४ वर्षे झाली ओरडतोय. शहरासाठी कन्सल्टंट घ्या. तुम्ही तुमचे कौतुक १० वेळा करु नका. आम्हालाही वाटते शहराचे चांगले व्हावे.

मा.लडकत (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मी माझ्या कौतुकासाठी माहिती देत नाही. २४ बाय ७ करण्यासाठी काय प्रयत्न केले ते सांगतोय.

मा.कैलास थोपटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहाने स्काडा प्रणाली मंजूर केली. हा विषय तुम्ही सभागृहात ठेवला आहे. सभागृहाला बदनाम करु नका. या तुमच्या चूका आहेत.

मा.लडकत (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मी वस्तुस्थिती सांगतोय. सभागृहाला बदनाम करत नाहीय.

मा.नारायण बहिरवाडे - अर्थसंकल्पात ४० टक्के पाणी देणार बोलला होता हे सुद्धा सांगा.

मा.महापौर - लडकत साहेब तुम्ही फक्त खुलासा करा. पाणी कसे देणार आणी काय याचे उत्तर द्या.

मा.लडकत (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, केंद्र शासनाकडून एस्टिमेट मंजूर करुन आणले आहे. प्राधिकरण व प्रेमलोक पार्क या दोन विभागांचा अभ्यास केला आहे. जसा यमुनानगरचा अभ्यास झाला तसा याचा अभ्यास पूर्ण झाला होता. पाण्याची परिस्थिती बिकट झाल्यामुळे हे झोन घेता आले नाहीत. टेंडर काढले आहे. त्यामुळे ४० टक्के भागात २४ तास पाणीपुरवठा करता येईल. संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा करता आलीतर या आठवड्यात हा प्रश्न पुन्हा मार्गी लावता येऊ शकतो.

मा.आर.एस.कुमार - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुमच्याकडे पाण्याचे डिस्ट्रीब्युशन आहे का. मग कसे ॲश्यूरन्स देताय. दुसरा जबाबदार अधिकारी आहे. तुम्ही कशाला या प्रश्नांची उत्तरे देताय. पाणीपुरवठ्याचे काम जे करतात त्यांनी उत्तर द्यायला पाहीजे. कमिशनर यांनी सांगायला पाहीजे. ते प्लॅन बघतात. डिस्ट्रिब्युशन तुमच्याकडे आहे का.

मा.महापौर - कांबळे साहेबांनी खुलासा करावा.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयावर गेले दोन तास सभागृह चालू आहे. तुम्हाला जेवढे प्रश्न विचारले तो विषय सोडून भाषण करायला तुम्ही नेते नाहीत. मी प्रश्न विचारला तेवढ्या प्रश्नांची उत्तरे पाहीजेत. पाणी एक वेळ देणार का दोन वेळ देणार याची उत्तरे अपेक्षित आहेत. आम्हाला रामायण, महाभारत सांगू नका. आज पिंपरी चिंचवड महापालिकेत नागरीकांचा प्रश्न आहे. दोन वेळ पाणी असल्यामुळे मंजूरी झाली आहे. २४ बाय ७ मुळे प्रॉब्लेम झाला आहे. तुम्ही काय करणार आहात. आमची अपेक्षा आहे. आम्हाला बाकी सांगू नका. स्काडा व मीटर पद्धतीवर आपला किती खर्च झाला याचे उत्तर द्या. नगरसेवकांनी जे विचारले त्याचे उत्तर द्या. उद्यापासून कशा पद्धतीने पाणी देणार त्याचे उत्तर द्या. तुम्हाला सभागृहाने मदत करायचा प्रयत्न केला आहे पण तुम्ही सभागृहावर ताशेरे उठवताय. तुम्ही वेळोवेळी जे जे मागितले त्या त्या पद्धतीने ठराव करुन दिला आहे. तुम्ही आत्ता सांगता सभागृहाने चुकीचे काम केले आहे ते तुम्हाला संबंधित नाही. २४ तास पाणी देणार मग त्याचे नियोजन कसे करणार ते सांगा.

मा.कांबळे (शहर अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्तापर्यंत एकूण २५ सन्मा. सदस्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. त्या सर्व मी लिहून घेतल्या आहेत. सभागृहाला वस्तुस्थिती माहित करुन देणे गरेजेचे आहे म्हणून सांगतो. पाटबंधारे विभागाने ३७० एमएलटी एवढे पाणी उचलायची परमिशन दिली आहे. आपण आज ४४० एमएलटी पाणी नदीतून उचलतो. यासंदर्भात सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. २०११-१२ साली आपण ४३२ एमएलटी पाणी घेत होतो. आज ४४० एमएलटी पाणी उचलतो. या ४ वर्षांमध्ये लोकसंख्या वाढली आहे. नळ कनेक्शन्स वाढले आणि पाण्याची मागणी सुद्धा त्या पटीने पाण्याची मागणी वाढली. तरीसुद्धा २०११-१२ पासून जेवढे पाणी उचलतो, तेवढ्या पाण्यात सर्व शहराला पाणीपुरवठा योग्य पद्धतीने करतो. यात मागील काळात धरणाची पातळी कमी झाली त्यावेळी आपण दि. १२ जुलैपासून एक वेळ पाणीपुरवठा सुरु केला. दि.११ जुलैला दिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला. अशा पद्धतीने पाणी सुरु झाल्यामुळे दि.२४ जुलैपासून पुन्हा एक वेळ पाणी पुरवठा सुरु केला आहे. मागील तीन/साडेतीन महिने माझा अनुभव आहे, एक वेळ पाणीपुरवठा केल्यामुळे तक्रारींचे प्रमाण अत्यंत कमी किंवा जवळजवळ नव्हते. फक्त नागरीकांच्या वेळेची अडचण होती. दोन वेळ पाणी असल्यामुळे त्यांना पाणी घेणे, वापरणे, साठवणे यासाठी मदत होत होती. लोकांना सोयीचे होत होते. त्यामुळे आम्हाला काही दिवसांपासून दोन वेळचा पाणीपुरवठा मागणी केल्यानंतर मी सुद्धा अनेक सदस्यांना विनंती करतो होतो, आत्ता ज्या भागात दोन वेळ पाणीपुरवठा होतो. तिथे झोनिंग करुन पाणी व्यवस्थित ठेवले आहे. पाणी व्यवस्थित मिळते आहे. ज्या भागात एक वेळ पाणीपुरवठा होतो, तिथे पाण्याचा वापर वाढला आहे. याचे कारण असे आहे, सेक्टर २३ मध्ये जे संप आहेत. त्याच्यावर संपूर्ण शहराचे नियोजन करता येते. त्याची लेवल चांगली राहते होती. आत्ता १६ तारखेपासून आपण परत मा.सभागृहाने दिलेली सूचना, मा.स्थायी समितीत झालेली चर्चा, त्याप्रमाणे १६ तारखेपासून आपण पुन्हा दि.१२ जुलैपूर्वीची परिस्थिती जशी आहे तशी सुरु केलेली आहे. त्यामुळे या ३/४ दिवसांत तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः चिंचवड ग्रॅव्हीटी

आणि थेरगाव या भागात मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. चिंचवड व थेरगाव इथे या पूर्वीसुद्धा दोन वेळ पाणीपुरवठा असताना सुद्धा तक्रारी होत्या. त्या शक्यतो जास्त प्रमाणात होऊ नयेत म्हणून प्रयत्न करत होतो. पण आत्ता या चार दिवसांत तक्रारीत वाढ झाली आहे. आपण आत्ता एकदा साडे तीन महिन्यांत नागरीकांना पाणी पुरवठा व्यवस्थित होत असताना त्यामध्ये बदल केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या बाबतीत मी माझ्या सर्व अभियंत्यांबरोबर बैठक घेऊन त्याची रुपरेषा ठरवतो. यासाठी मला ८/१० दिवस लागतील. त्याकरिता आपण सहकार्य करावे अशी विनंती आहे.

मा.दत्तात्रय साने-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पाणीपुरवठ्याच्या विषयावर अधिका-यांचा निषेध करुन सभा तहकूब करावी. ते चुकीचे उत्तर देत आहेत. मला वाटते, प्रत्येक नगरसेवक अनेक वेळा सभागृहात फक्त पाण्याच्या विषयावर बोंबलला आहे. तुम्ही म्हणताय, चार दिवसांत तक्रार येते आहे. आम्ही तिकडून कशाला येतो. आम्हाला काही भागांत तीन/चार वाजता पाणी येते. माझी पक्षनेत्यांना विनंती आहे की, या विषयावर निषेध करुन पाणीपुरवठाविषयी सभा तहकूब करण्यात यावी. कांबळे साहेब,तुम्ही अजूनही विषय डायव्हर्ट करताय. तुम्ही चार दिवस, आठ दिवस काय करत होता? आत्तापर्यंत काय केले?

मा.नारायण बहिरवाडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रशासनाचा निषेध करुन, पाणीपुरवठ्याचा निषेध करुन आजची सभा तहकूब करावी या सूचनेला अनुमोदन देतो

मा.कांबळे (शहर अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वेगवेगळ्या ठिकाणच्या तक्रारींचे स्वरुप वेगवेगळे आहे.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता अनेक नगरसेवक बोलत होते. मी सुद्धा सर्वांचे म्हणणे ऐकले आहे. कांबळे साहेबांनी सांगितले आहे. २५ ते ३० नगरसेवक या विषयावर बोलले. वास्तविक पाहता, आयुक्त साहेब, कांबळे साहेब यातील गांभिर्य लक्षात घ्या. प्रत्येक वॉर्डात प्रत्येक नगरसेवकाला अडचणी आहेत. काही नगरसेवकांना सकाळी ५ पासून फोन सुरु होतात. सर्वांना अडचणी आहेत. स्काडा प्रणालीबद्दल व पाणी वितरणाबद्दल मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले. वास्तविकपाहता स्काडा प्रणाली पाणीवितरण किती करतो किती पंपिंग करतो याचे ऍनॅलिसिस सांगते. त्यामुळे प्रश्न सुटणार नाही. कुठे लिकेज आहे का. कांबळे साहेब आपण पूर्ण माहिती घ्या. त्यानंतर लिकेज डिटेक्शनसाठी लाखो रुपये खर्च केले त्या मशीन्स अशाच धूळ खात पडून आहे. त्यातील किती काम करतो, कोण लोक काम करतात, कोण त्यासाठी नेमले आहेत. याची माहिती घ्या. एकंदरीत किती रुपये स्काडा प्रणालीवर खर्च केले, त्याचा उपयोग होत नाही अशातला भाग नाही. सुधारणा झाली. गेल्या वर्षभरात सहा महिन्यांत पावसाळा संपला. पाणी कमी पडले. त्यानंतर शहरात पाणीपुरवठयाचा खेळखंडोबा झाला आहे. कोणी नीट जबाबदारी घ्यायला तयार नाही. सगळा भाग मग स्लोपिंग कुठे, राईझिंग कुठे याचा अभ्यास करणे हे अधिका-यांचे काम आहे. यमुनानगर देखील प्राधिकरणात गेलेतर यामुळे प्रश्न सुटणार नाही. लोकसंख्या वाढली आहे. पाण्याची मागणी

वाढली आहे. शहरात अनेक बंगले झाले, सोसायट्या झाल्या. या सर्व गोष्टी माहित आहेत. बिल्डींग परमिशन देत असताना त्यावेळी पाण्याचा सप्लाय होतो का नाही ते बघूनच देतोय. वॉटर ऍनॅलिसिस देतो. म्हणजे त्यावेळी आम्ही सक्षम आहोत. आम्ही तुम्हाला पाणी देऊ शकतो. अमुक टाकी बंद आहे. ऊंच कनेक्शन करा. असे आम्ही सांगतो. म्हणजे नियोजनाचा अभाव आहे. कन्सल्टंट करत असेलतर कन्सल्टंट नेमा. परंतू या सभागृहाने वेळोवेळी पाण्यासाठी जी मदत लागेल ती देण्याचे काम केले आहे. पक्षपात केला नाही. नेहमी मदत केली आहे. मग असे असताना स्काडामध्ये सुधारणा करायची आहे. अनेक टाक्या बांधायच्या आहेत. लिकेजमध्ये सुधारणा करायची आहे. जिथे पाण्याची सतत बोंब आहे तिथले नगरसेवक सारखे ओरडतात, ते का ओरडतात. नुसते अजेंडावर फक्त ७/८ विषय आहेत. लोक गेले अडीच तासापासून सतत घसा कोरडा करुन बोंबलत आहेत याचे गांभिर्य तुम्ही घेतले पाहीजे. आम्ही चेष्टा करत नाही. आम्ही नाव ठेवायला इथे आलो नाहीत. तुम्ही आमचे वैरी नाहीत. ही शहरातली गंभीर समस्या आहे. तुमची स्काडा मशीन बोलणार आहे का. कागद बोलणार आहेत का. ज्या लोकांना समस्या आहे, त्याबद्दल लोक बोलतात म्हणून आम्ही बोलतो. पक्षनेत्यांनी उल्लेख केला. शहरात परिस्थिती विस्कळीत आहे. पाणी एक वेळ ठेवायचे का दोन वेळ ठेवायचे हा प्रशासनाचा विषय आहे. एक वेळ पाणी करतानाही तुम्हाला आम्ही मदत केली होती. तुम्हाला टाईम मॅनेजमेंट करता येत नाही हे तुम्हाला सुद्धा मान्य आहे आमच्याकडे काम करणारे बांधव आहेत. पहाटे ३ वा. पाणी सोडतात. तासाभरात पाणी जाते. संध्याकाळचा पाणी द्यायचा टाईम ३.३०, ४.३० ला पाणी बंद होते. काम करणारे दांपत्य सकाळी ८.०० वा. घर सोडतात, संध्याकाळी ६.०० वा. घरात येतात. भगीनी काम करतात. मग पाणी कसे भरायचे. ते सुद्धा प्रेशरने नाही. यात नियोजनाचा अभाव नाही का. ते म्हणतात, झोपडपट्टीतील लोकांना पाणी वाटायचे, बोलायचे नाही. त्यांना सकाळी पाणी देणार, इथे संध्याकाळी अपूरे पाणी देणार. अजमेरा,नेहरूनगर, संततुकारामनगरचे उदाहरण दिले. यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे. पाण्याचे वाटप कसे करायचे. पंपिंग कसे असणार. दोन तास प्रेशरने पाणी द्या. ही जबाबदारी प्रशासनाची आहे. आमच्या वतीने का करतात. मा.महापालिका सभा तहकूब करायला आम्हाला आनंद आहे. म्हणजे मतदार आम्हाला शाबासकी देणार आहेत. तुम्ही राजिनामा द्या. आम्ही तुम्हाला निवडून द्यायचे, आम्ही काय उत्तर द्यायचे. काल पंप खराब झाला. मेंटेनन्स काढले आहे. लाईट नव्हती. असे खोटे खोटे बोलायची आम्हाला लाज वाटते. जसे अधिकारी झोपतात, तसे आम्ही फोन बंद करायचा व झोपायचे अशी परिस्थिती आमच्यावर आली आहे. पूर्वी वॉटर सप्लायला जे अधिकारी चांगले होते त्यांना दुसरीकडे टाकले असेलतर त्यांना परत घ्या. त्या त्या भागातले अधिकारी यांच्याकडून अधिक दोन तास काम करुन घ्या. अधिका-यांना प्रमोशन देण्यासाठी आम्ही बोलत असतो. लोकांना वाटते, मा.योगेश बहल अधिका-यांचा वकील म्हणून आला आहे. शहर अडचणीत आहे तर अधिका-यांचे सुद्धा कर्तव्य आहे. शहरातील नागरीक म्हणून, शहराचा उत्तरदायी म्हणून विभागाला मदत केली पाहीजे. अशा लोकांना लडकत साहेब, कांबळे साहेब यांनी मिटींग घेऊन नियोजन केले पाहीजे. मला आठवते, मा.यशवंत भोसले उपोषणाला बसले होते. मा.आशिष शर्मा यांनी डायसवर मशीन लावले होते. त्याचा टाईम ऍडजस्ट केल्यावर पाणीपुरवठा सुरळित झाला होता. प्रत्येकाची काम करायची पद्धत वेगळी असते. तुम्हाला मनापासून सांगतोय, दोन

दोन महापालिका सभांमध्ये तोच तोच विषय चालला आहे. आत्ता कांबळे साहेबांनी सांगितले, वास्तविक पाहता दोन वेळ पाणी केल्यानंतर गेले आठ दहा दिवस खात्री नव्हती, कॉन्फीडन्स नव्हता. तुम्ही टेक्निकलमध्ये आहात. इतके एमएलटी पाणी येते. नागरीकरण झाले आहे. या फीगर्स आम्हाला नकोत. भूलथापा नकोत. We want practical conclusion. जे डिसिजन होतात, त्यात लोकांना एक वेळ पाणी द्या. सभागृहाने म्हटले आहे ते सुद्धा करु शकाल. जो विस्कळीतपणा आला आहे. पाण्याचे वितरण व्यवस्थित नव्हते. आत्ता सुद्धा पाण्याचे वितरण व्यवस्थित नाही. याचा आढावा होतो. ८/१० दिवसांचा वेळ मागताय. चार चार महापालिका सभांमध्ये असे बोलले जात असेलतर, त्यावर निर्णय होत नसेलतर सभा तहकूब करायला पाहीजे. तुमचा निषेध करुन प्रश्न सुटणार आहे का. खरे पाहता दोघांनी विभागातील लोकांनी बसून कोणकोणत्या भागात प्रॉब्लेम आहे ते तुम्ही वर्कआऊट करायला पाहीजे आहे. आयुक्त साहेबांनी पुढारी बनण्याआधी विचार करायला पाहीजे होता. ते पुढा-यांसारखे आश्वासन देतात. त्या खूर्चीवर बसत असताना खरेतर दोन वेळेला पाणी देऊ शकतो का हे विभागाकडून विचारायला नको का. निर्णय घेण्यापूर्वी विचार करायला नको का. सभागृहाने कधी निर्णय घेतला म्हणून करणार का. आम्ही म्हणून तुम्ही करणार आहात का प्रॅक्टीकली पॉसिबल होते का हे बघणे गरजेचे आहे. नगरसेवक सगळे पोटतिडकीने बोलत आहेत. कांबळे साहेब हे सिनिअर मोस्ट अधिकारी आहेत. परिपक्व उत्तर देताना फक्त उत्तर नव्हे तर शहरातील अडचणी कशा दूर होतील यावर तोडगा काढा. जो कालावधी त्यांना लागतो, त्यांना द्या. ८ दिवसांत हा प्रश्न सोडवलाच पाहीजे. रात्रंदिवस काम करा. गरज पडेल तसे एक वेळ पाणी दिले. ज्या भागांत किमान दोन/तीन तास पाणी दिले, तिथे प्रेशरने पाणी आले पाहीजे. कोणत्याही नगरसेवकाचा पुढील जी.बी. मध्ये आवाज उठला नाही पाहीजे. जिथे खरी गंभीर परिस्थिती असेलतर ते मान्य करा. ही टॅक्ट ठेवल्याशिवाय, हे काढल्याशिवाय प्रश्न सोडवू शकत नाही. आम्हाला तुमच्या डिस्ट्रीब्युशन याच्याशी देणे घेणे नाही. स्काडाशी देणे घेणे नाही. मा.महापौर साहेब, आपण आदेश द्यावा व निषेध करुन काही होणार नाही. महापालिका सभा पूर्ण करावी. कांबळे साहेबांनी सांगावे. ८ दिवसांचा कालावधी त्यांना द्या. एक वेळ किंवा दोन वेळ पाणी द्या. पण पुरेपूर पाणी द्या अशी विनंती करतो. सभागृहाला विनंती करतो, आपण सुद्धा आपली कारकीर्द करावी.

मा.महापौर - पाण्याबाबतीत ज्या सूचना मांडल्या आहेत, कांबळे साहेब, या १० दिवसांत त्या आज मंजूर झाल्या आहेत. हे सभागृह खरेतर कामकाजासाठी आहे. नगरसेवकांची भावना तुमच्यापर्यंत पोचवावी म्हणून हा वेळ वाया घालवला आहे. हा वेळ वाया न जाता येत्या १० दिवसांत नागरीकांना चांगले पाणी द्यावे असा आदेश देते. पाण्याचा प्रश्न यापुढे सभागृहापुढे आला नाही पाहीजे. सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांचे पालन १० दिवसांत झाले पाहीजे. कांबळे साहेब, आदेशाचे पालन होणार का याचा खुलासा करा.

मा.कांबळे (प्र.शहर अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मा.महापौर साहेब यांनी आदेश दिला. त्याप्रमाणे मी व माझी

टिम बसून आठ दिवसांत सर्व कार्यवाही पूर्ण करतो. जिथे जिथे अडचणी येतील तिथे नगरसेवकांना सांगून आपणही त्यासंदर्भात सहकार्य करावे अशी विनंती करतो.

मा.आर.एस.कुमार - मा.महापौर साहेब, डिस्ट्रिब्युशनसाठी सहा वेगवेगळे अधिकारी आहेत. त्यांच्यावर एक एचओडी ठेवावा.

मा.नारायण बहिरवाडे - मा.महापौर साहेब, तहकूबी मागे घेतल्याशिवाय हे सभागृह चालविता येणार नाही.

मा.महापौर - मी सूचना मंजूर केलेली नाही.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वास्तविक पाहता सभागृहाच्या भावना इतक्या तीव्र आहेत. सभागृहाचे म्हणणे आहे, १० दिवस मा.महापालिका सभा तहकूब करा. तरी अशा परिस्थितीत वाटते, आमचे सन्मा.सदस्य दत्तात्रय साने यांनी सांगावे, तुम्ही सूचना मागे घ्या. त्यांना संधि द्या. तेवढी जबाबदारी स्विकारणार असालतर आपण सांगा, जबाबदारी स्विकारतो. मग आम्ही तहकूबी सूचना मागे घेतो. पाणी एक वेळ देणार का दोन वेळ हे त्यांनी ठरवावे.

मा.कांबळे (प्र.शहर अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मा.साने यांनी जी तहकूब मांडली आहे, त्यांच्या तीव्र भावना मी स्विकृत करतो. या ८/१० दिवसांत मी माझ्या सर्व टिमसहीत बसून कार्यवाही पूर्ण करायचा शंभर टक्के प्रयत्न करेन. जिथे जिथे अडचण असेल त्यावेळी काका किंवा भाई यांचे सहकार्य घेईन.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पाणी सोडायला कुठलीही मदत लागत असेल तर तिथे आम्ही येतो. अन्य सभासद बोलले आहेत. फक्त साने म्हणून मी बोललो नाही. सगळ्यांच्या वतीने मी बोललो आहे. आयुक्त साहेब, कांबळे साहेब यांनी आश्वासन दिले आहे, १० दिवसांत हा विषय संपला नाही तर पुढील २० तारखेची महापालिका सभा याच विषयावर तहकूब करु व निषेध करुन आजची तहकूबी सूचना मागे घेतो.

मा.नारायण बहिरवाडे - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

------------

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ५९८ | विषय क्रमांक- १ |
| दिनांक- २०/११/२०१४ | विभाग- मा.आयुक्त |

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१५/कावि/६६१/१४ दि.२७/१०/२०१४

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.९०१४ दि.५/११/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भुखंड, घरदुरुस्ती, घरविस्तार अग्रिम दिले जात आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासन वित्त विभाग

यांचेकडील शासन निर्णय क्रमांक घबांअ-१०.११/ प्र.क्र.५६/२०११/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक २७ फेब्रुवारी २०१२ व मा.महापालिका समिती ठराव क्रं.८० दि.०१/०९/२०१२ अन्वये सुधारीत वेतनबँड मधील वेतन (मुळवेतन+ग्रेडवेतन) विचारात घेऊन अग्रिम रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत खाली नमुद केलेप्रमाणे सुधारणा केली आहे. महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ मधील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा र.रु.२०,००,०००/-, घरविस्तार अग्रिम र.रु.४,००,०००/-, घरदुरुस्ती अग्रिम र.रु.२,००,०००/- व भुखंड खरेदी र.रु.४,००,०००/- तसेच घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता दिलेली असलेने प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ चे परिपत्रक निर्गत केले आहे. त्यानुसार घरबांधणी अग्रिम मंजुरीचे धोरण राबविले जात आहे. तसेच परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ मध्ये नमुद केलेली अट क्र.१ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/१३८/२०१३ दि.२९/०१/२०१३ अन्वये बदल करणेत आलेला आहे.

**मुळ अट-** महानगरपालिका आस्थापनेवरील ज्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत सलग ०५ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

**सुधारीत अट**- महानगरपालिका आस्थापनेवरील ज्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत सलग ०३ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील. मात्र सदर अटीमध्ये दुरुस्ती करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभा यांची मान्यता घेणेत आलेली नाही. सदर अटीस मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेची दि.२९/०१/२०१३ पासून कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक वाटते. सदर शासन निर्णयामध्ये घरबांधणी अग्रिम मंजूर करताना एकूण १४ अटी नमूद केल्या आहेत. त्यापैकी अट क्र.६ मध्ये अर्जदाराची स्वतःच्या नावावर घर/जमिन भारतात कोठेही असले तरी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय असल्याचे नमुद केले आहे. तथापि या संदर्भात महापालिका ठराव क्र.४६७४, दिनांक ११/०६/२००२ नुसार परिपत्रक क्रमांक प्रशा/११/कावि/१०९/२००३, दिनांक १०/०३/२००३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपलिका हद्दीतच फलॅट खरेदी/घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील तिच अट प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ चे परिपत्रकात नमूद केली आहे. यापूर्वी घरबांधणी अग्रिम मंजुरीसाठी अंतर मर्यादा वाढविणेकामी महापालिका सभा ठराव क्र.१४१३ दि.०८/०३/१९९०, ठराव क्र.३८७५ दिनांक १९/०९/१९९८ व ठराव क्रं.४१४४ दि.२८/१०/१९९९ नुसार मान्यता घेणेत आलेली आहे. मा.आयुक्त व महासंघ यांचे मधील दि.२४/०७/२०१४ चे बैठकीमध्ये विषय क्र.१५ नुसार मा. आयुक्त यांनी घरबांधणी कर्जाकरीता मनपा हद्दीपासून २० कि.मी. अंतरापर्यंत बदलासाठी प्रस्ताव करणेस सुचविले आहे. त्यास अनुसरुन तसेच घरबांधणी/भूखंड/घरदुरुस्ती व घरविस्तार अग्रिम परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ मधील अट क्र.६ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणेत आवश्यक आहे

**मुळ अट** - पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हद्दीतच घर/फ्लॅट खरेदीसाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील. तसेच सदरचे घर/फलॅट अर्जदाराच्या स्वत:चे नावे असणे आवश्यक राहील.

**सुधरित अट**--पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीपासून २० कि.मी. अंतरापर्यंत घर/फ्लॅट खरेदीसाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील. तसेच सदरचे घर/फलॅट अर्जदाराच्या स्वत:चे नावे असणे आवश्यक राहील. सबब, परिपत्रक क्रं.प्रशा/११/कावि/०१/२०१३ दि.०१/०१/२०१३ मध्ये नमुद केल्यानुसार उपरोक्त घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या अटीमधील अट क्र. १ व ६ मध्ये सुधारणा करणेस तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमित वेतनश्रेणीत मा.आयुक्त यांची मागणी ३ वर्षे असलीतरी सलग २ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचा-यांस घरबांधणी अग्रीम अनुज्ञेय करण्यास तसेच घरबांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा र.रु. २०,००,०००/- ऐवजी र.रु.२५,००,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये पंचविस लाख फक्त) करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.श्रद्धा लांडे - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.नंदा ताकवणे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- २

दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४
६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४
७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५७९ दि.१०/११/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,

निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.आशा सुर्यवंशी - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

मा.उल्हास शेट्टी- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

मा.तानाजी खाडे- मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५९९ विषय क्रमांक- २
दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४
६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४
७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५७९ दि.१०/११/२०१४

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ३

दिनांक- २०/११/२०१४

विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४

७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८० दि.१०/११/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दीत समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,निघोजे, देहू, विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी, जांबे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेत येत आहे.

मा.श्रद्धा लांडे - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

मा.उल्हास शेट्टी - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

मा.तानाजी खाडे - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६००                                    विषय क्रमांक- ३
दिनांक- २०/११/२०१४                                    विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४
६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४
७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८० दि.१०/११/२०१४

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१                                    प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६०१                                    विषय क्रमांक- ४
दिनांक- २०/११/२०१४                                    विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२६१/२०१४, दि.२१/०८/२०१४
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र. २३ दि. ०९/०९/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८९ दि.१०/११/२०१४

मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २८ दिनांक १०/०७/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ किवळे येथील सर्व्हे नं.९२ येथे स्मशानभूमीकडे जाणा-या १२ मी.रस्त्याचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. या आरक्षणामुळे येथील कायम स्वरुपी रहिवाशी असलेल्या लोकांची घरे बाधीत होणार आहेत. महापालिकेने यापूर्वी जाहिर केलेल्या प्रारुप आराखडयामध्ये हा १२ मी. रस्ता सर्व्हे नं.९१ मध्ये होता. सर्व्हे नं.९१ मध्ये कोणतेही घर नाही व नंतर पालिकेने विकास आराखडयात हा रस्ता सर्व्हे नं.९१ व ९२ च्या सिमेवरुन टाकणेत आला आहे. त्यामुळे सर्व्हे नं.९२ ची घरे व शेतक-यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे हा रस्ता महानगरपालिका नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन पूर्वीच्या सर्व्हे नं.९१ मधील मोकळया जागेमध्ये स्थलांतरीत करणेस तसेच सर्व्हे नं.८२ किवळे १८ मी. रस्त्याचे आरक्षण आहे. त्यामुळे एका शेतक-यावर अन्याय होत आहे. त्यामुळे तो

रस्ता सर्व्हे नं.८१ व ८२ मध्ये समांतर टाकणेबाबत पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.श्रद्धा लांडे - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.नंदा ताकवणे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६०२ विषय क्रमांक- ५

दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/कप्र/११७/२०१४ दिनांक २६/०३/२०१४

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.४९४ दि.०५/०७/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३९ दि. ०५/०८/२०१४

सौ.निर्मला विजयराव तापकिर यांनी पिं.चि.मनपा निवडणुक २०१२ मध्ये निवडुन आलेल्या सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री. नितीन प्रताप काळजे यांचे अनाधिकृत बांधकामाबाबत दि.२९/१२/२०१३ रोजी अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने त्यांनी सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री.नितीन प्रताप काळजे यांचे विरुद्ध मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. ३११७/२०१२ व ६२६५/२०१२ दाखल केल्या होत्या. त्यातील मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे संबंधीत अनाधिकृत बांधकामाबाबतचा निर्णय न्यायालयाच्या कार्यकक्षेत असलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०/१ (ड), ११ व १२ च्या तरतुदीच्या अनुषंगाने सौ.विनया प्रदीप तापकीर यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१२/२०१४ दि.१०/२/२०१४ व श्री.नितीन प्रताप काळजे यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१४/२०१४ दि. १०/२/२०१४ नुसार अनधिकृत बांधकामाबाबत खुलासा मागविणेत आला होता.

सौ.विनया प्रदीप तापकीर यांनी दि.२४/२/२०१४ रोजी सादर केलेल्या खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे माझे सास-याचे असले तरी ते माझ्यावर अवलंबून नाही व मी अनाधिकृत बांधकाम केलेले नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड) च्या तरतुदी मला लागु होत नाही, असा खुलासा सादर केला आहे.

श्री.नितीन प्रताप काळजे यांनी आपले दि.२४/२/२०१४ रोजी आपले खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे ही माझे वडीलांचे मालकीची असून त्या मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. माझे वडील माझेवर कोणत्याही प्रकारे अवलंबीत नाही, त्यामुळे महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड), ११ व १२ च्या तरतुदीनुसार माझे विरुद्ध कोणतीही कार्यवाही प्रस्तावित करु नये असा खुलासा सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांनी सादर केलेल्या खुलाशानुसार अनधिकृत बांधकामामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ११ व १२ मधील तरतुदी अन्वये सदस्यांचे अर्हतेबाबतचा प्रश्न निर्माण झाल्याने मा.न्यायाधिशांकडुन निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १२ मधील तरतुदी नुसार असा संदर्भ मा.न्यायालयाकडे करण्यासाठी मान्यता देणेत येत आहे.

मा.सुरेखा गव्हाणे - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ६

दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशासन/८/कावि/७०९/२०१४ दि. ६/०९/२०१४

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.५९१ दि.१०/११/२०१४

श्री.बळवंत तुकाराम बनकर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेमधून गट अ दर्जाच्या कार्यकारी अभियंता पदावरुन दिनांक ३१/१०/२०१२ रोजी स्वेच्छानिवृत्त झालेले आहेत. पोलिस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी दिनांक २१/०४/२०१४ रोजी सादर केलेल्या अहवालान्वये श्री.बनकर यांनी स्वत:चे, पत्नीचे व मुलांचे नावे एकुण र.रु २,०६,९४,६६४/- किंमतीची मालमत्ता असून पैकी सन २००६-०७ या आर्थीक वर्षात -४.८९%, सन २००७-०८ या आर्थीक वर्षात -१.५०%, सन २००८-०९ या आर्थीक वर्षात -०.०८%, सन २०१०-११ या आर्थीक वर्षात -४.८५%, सन २०११-१२ या आर्थीक वर्षात -२.७२% अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाले असल्याबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील कलम १९ नुसार प्रत्येक शासकीय कर्मचा-यास स्वत:च्या नावाने किंवा कोणत्याही कुटूंबियाच्या नावाने कोणतीही स्थावर मालमत्ता भाडे पट्ट्याव्दारे, गहाणाव्दारे, खरेदीव्दारे, विक्रीव्दारे भेट म्हणून किंवा अन्य मार्गाने संपादित करता येत नाही किंवा तिची विल्हेवाट करता येत नाही. त्यासाठी त्याला विहित प्राधिकरणाला लेखी स्वरुपात अगोदर कळवावे लागते इतकेच नव्हे तर या पैकी कोणताही व्यवहार कार्यालयीन व्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर केला असेल किंवा नेहमीच्या अथवा

प्रसिध्द व्यापा-याच्या मार्फत केलेला नसेल तर मात्र विहित प्राधिकरणाची पूर्व मंजूरी देखिल मिळविणे बंधनकारक आहे.

शासकीय कर्मचा-याशी कार्यालयीन व्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर नसलेला तसेच नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-यामार्फत करावयाचा कोणताही व्यवहार वर्ग-एक किंवा वर्ग-दोनचे पद धारण करणा-या शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत र.रु २०,०००/- हून जास्त किंमतीचा असेल तर विहित प्राधिकरणाला त्याने कळवायचे असते, परंतु त्याहून अन्यप्रकारचा कोणताही व्यवहार करण्यापूर्वी विहित प्राधिकरणाची पुर्व मंजूरी मिळविणे आवश्यक आहे. परंतु श्री.बनकर यांनी संपादित केलेल्या मालमत्तेची माहिती सादर केलेली नाही अथवा पूर्व परवानगीही घेतलेली नसल्याने श्री.बनकर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील कलम १९ चा भंग केल्याने विभागीय चौकशी करण्याबाबत पोलिस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी कळविलेले आहे.

तरी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (२) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही. अशी तरतुद आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. श्री.बळवंत तुकाराम बनकर, कार्यकारी अभियंता (निवृत्त) यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदींच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्याबाबत मान्यता देणेत येत आहे.

मा.श्रद्धा लांडे - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाची माहिती द्यावी. हा विषय आमच्यासमोर कशासाठी आणला आहे याची माहिती द्यावी.

मा.डॉ.डोईफोडे (सहा.आयुक्त, प्रशासन) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, श्री.बळवंत तुकाराम बनकर हे मनपा सेवेतील गट अ दर्जाचे कार्यकारी अभियंता म्हणून सेवानिवृत्त झालेले अभियंता आहेत. त्यांची पोलीस अधिक्षक अँटी करप्शन यांनी संपादीत मालमत्तेबाबत चौकशी केली आहे. त्यात त्यांनी जी मालमत्ता संपादीत केली आहे ती संपादीत करत असताना मनपा प्रशासनाची परमिशन घेतली नव्हती असे आढळले आहे. त्यांनी पत्राद्वारे आयुक्तांना कळवले आहे. यांच्या संपत्तीबाबतीत परमिशन न घेण्याबद्दल प्रकरण आहे. त्याची चौकशी करण्यात यावी. परंतू हे कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त झाले असल्यामुळे नियम २७ ब नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची चौकशी करण्यासाठी मा.महापालिका सभेची परवानगी घ्यावी लागते. म्हणून परवानगी घेण्यासाठी हा विषय इथे ठेवला आहे.

मा.योगेश बहल-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,हे सहाय्यक आयुक्त त्यावेळी ते नव्हते. दि.३०/१०/२०१२ ला बनकर साहेब रिटायर्ड झाले. अलिकडच्या काळात माहिती अधिकारात अधिका-यांनी संपत्तीचे डिक्लरेशन करावे लागते. असा कायदा त्यावेळी आला नव्हता किंवा करत नव्हते. अधिका-यांच्या गाड्या आहेत, फॅक्ट-या आहेत काय काय दिसले आहेत हे सभागृहाला माहित आहे आपण ते सांगत नाही. सीआयडी यांनी फाईल क्लोज केली आहे. डिक्लरेशन केले नाही म्हणून तुम्ही त्यांची डी.ई. करु शकता का. दुसरी गोष्ट म्हणजे अशा प्रकरणांमध्ये टक्के असतात. गव्हर्नमेंटमध्ये असलेल्या अधिका-याची संपत्ती १० टक्यांपेक्षा अधिक असेल तर ते गंभीर स्वरुपाचे मानले जाते. मग त्या संपत्तीची चौकशी होते. मनपाने कोणती देय रक्कम ठेवली आहे का. मनपाने त्यांना सगळा मोबदला दिला आहे. स्वतः सीआयडी यांनी त्यांची फाईल बंद केली आहे. .५८ - ने संपत्ती दाखवली आहे. .१ टक्क्यापेक्षा कमी दाखवले आहे. त्यासाठी जी.आर. आहेत. स्वतः घर बांधले त्यातून उत्पन्न मिळते आहे. वास्तविक पाहता प्रशासनाने एक्सप्लेनेशन नीट पाहीले असते तर हा विषय सभागृहासमोर आला नसता. घरे किती, बायकोच्या नावावर काय, वडीलांच्या नावावर काय याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. .५८ - असे दिसते आहे. असे असताना सुद्धा आपल्या अंगावर काय टाकून घ्यायला नको. सभागृहाच्या अंगावर ढकलून द्या म्हणून प्रशासनाने अशा अधिका-यांचा विषय ठेवले काय म्हणून मा.महापालिका सभेसमोर हा विषय आला आहे. सीआयडीची फाईल बंद झाली. याची डी.ई. करु शकतो का याचे उत्तर पाहीजे. तुम्ही काही रकमा अडवून ठेवल्या आहेत का.

मा.डॉ.डोईफोडे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सदस्यांनी विचारले होते. त्या पद्धतीने अँटी करप्शन ब्युरो यांनी चौकशी करुन फाईल बंद केली आहे हे सत्य आहे. त्यांच्या चौकशीत करु. श्री.बनकर यांनी कलम १९ व २० नुसार मनपाची परमिशन घेतली नाही. मालमत्ता संपादीत करण्याबाबत चौकशी करायला त्यांनी सूचविले आहे. त्यात स्पष्ट केले आहे, चौकशी करुन हे निष्पन्न झाले आहे. त्यांनी मनपाची परमिशन घेतली नाही, त्या मर्यादेत चौकशी करणार आहोत. त्यांच्याकडून खुलासा सुद्धा मागवला आहे. त्यांनी त्यांच्या पत्नीच्या, मुलाच्या नावावर काही संपत्ती संपादीत केली असे म्हटले आहे. हेच तपासण्यासाठी चौकशी करणे प्रस्तावीत केले आहे. मा.महासभेची परवानगी आवश्यक असल्यामुळे हा विषय इथे आला आहे. त्याची रक्कम किती ते सांगता येणार नाही. त्यांची खात्री करुन घेतो. याची चौकशी करायला अनुमती द्यावी.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, श्री.बनकर हे जुनेजाणते चांगले अधिकारी होते. त्यांनी प्रॉपर्टी घेतली होती. आज महापालिकेत अशी चौकशी केली तर समजेल तसे डिक्लरेशन आत्ता घेतात. असे शंभर अधिकारी घरी पाठवावे लागतील. मागील वर्षापासून ही पद्धत सुरु झाली आहे. २००९ पर्यंत माहिती दिली होती. २०१०,२०११, २०१२ या ३ वर्षांतली माहिती दिली नव्हती. २०१२ मध्ये त्यांनी रिटायरमेंट घेतली होती. महापालिकेकडून प्रशासनाने सगळे काम केले आहे. त्यांनी सगळे देणे दिले आहे. काही येणे नाही. मग हा विषय करण्यात

काय पॉईंट आहे. आमच्याकडे मग कशाला आला आहात. हा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

मा.बाबासाहेब धुमाळ - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६०३ विषय क्रमांक- ६
दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.प्रशासन/८/कावि/७०९/२०१४ दि. ६/०९/२०१४
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.५९१ दि.१०/११/२०१४

विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.भारती फरांदे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६०४ विषय क्रमांक- ७
दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/६/कावि /३२५/२०१४
दि.७/११/२०१४

**विषयाचा आशय-** थेरगाव येथील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीचे वीज बिल र.रु.१,५७,११०/- म.न.पा. मार्फत आदेश क्र.भूजि/कावि/१७९/१४ दि.१/७/१४ अन्वये अदा करणेत आले आहे. सदरचे खर्चास मा.महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता घेणे व या पुढील कालावधीतील सदर ठिकाणचे येणारे विदयुतबिल म.न.पा. मार्फत (ब प्रभाग विदयुत विभाग) अदा करणे व प्रस्तुतकामी झालेल्या करारनाम्यामध्ये त्यानुसार दुरुस्ती करणे

म.न.पा. हद्दीत थेरगाव स.नं. ९ येथे म.न.पा. व दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांचेवतीने संयुक्त क्रिकेट अकादमी प्रकल्प कार्यान्वीत आहे. सदर ठिकाणचे वीज वापरापोटी एकूण र.रु. १,५७,११०/- चे वीज बिल प्राप्त झाले होते. सदरचे वीज बिल न भरलेने तेथील विदयुत पुरवठा महाराष्ट्र स्टेट इले. डिस्ट्री. कं. लि. यांचेकडून खंडीत करणेत आला होता त्यामुळे सदर बिल तातडीने भरणे आवश्यक असलेने सदर र.रु.१,५७,११०/- चे वीज बिल मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३४० दि.२६/२/१४ चे अनुषंगाने आदेश क्र.भूजि/६/कावि/३००/२०१४ दि.३०/९/२०१४ अन्वये म.न.पा.मार्फत अदा करणेत आले आहे. सदर खर्च रक्कमेस मा.महापालिका सभेची

मान्यता न मिळालेस सदर खर्चाची रक्कम दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी यांनी म.न.पा.कडे भरणे या अटीवर सदरचे बिल अदा करणेत आले आहे.

दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी मधील प्रशिक्षणानार्थी मुले म.न.पा. परिसरातील असल्याने तसेच संस्थेची आर्थिक परिस्थिती पाहता तेथील विदयुतबिल (थकीत व त्यापुढील काळातील) म.न.पा.ने भरणेस तसेच सदर संस्थेबरोबर यापुर्वी झालेला करारनामा दुरुस्तीसाठी योग्य त्या बदलासह मंजूर करणेस मा.नगरसदस्य पारित मा.स्थायी समिती ठराव क्र.६३४० दि.२६/२/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे.

दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी यांनी त्यांचे अकादमीस सदरचे ठिकाणी उत्पन्नाचा कोणताही स्त्रोत नाही व त्यांचा तेथे नफा मिळविण्याचा हेतू नाही त्यामुळे सदर ठिकाणचे सध्या आलेले वीज बिल र.रु. १,५७,११०/- व पुढील कालावधीत येणारे वीजबिल कायमस्वरुपी म.न.पा. मार्फत भरणेबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता थेरगाव येथील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीचे सध्या आलेले वीज बिल र.रु. १,५७,११०/- म.न.पा. मार्फत अदा करणेत आले आहे. सदरचे वीज बिलाचे खर्चास कार्योततर मान्यता मिळणे व यापुढील कालावधीतील सदर ठिकाणचे येणारे विदयुतबिल म.न.पा. मार्फत (ब प्रभाग विदयुत विभाग) अदा करणे व प्रस्तुतकामी झालेल्या करारनाम्यामध्ये त्यानुसार दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.आशा सूर्यवंशी - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६०५ विषय क्रमांक- ८

दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

दि. ३/९/२०१४, दि. ९/९/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६०६ विषय क्रमांक- ९

दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

दि. २०/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १०

दिनांक- २०/११/२०१४ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.माध्य/शि/३/कावि/२०१/२०१४ दि.१४/११/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी चिचंवड मनपा हददतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयांमधील इ. 10 वी 12 वीच्या विदयार्थ्यांना बक्षीस रक्क्कम देणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र. 7233 दि. 08/7/2014 अन्वये खाजगी शाळांमधील जे विदयार्थी 85 ते 90 टक्के गुण संपादन करतील त्यांना प्रत्येकी र.रु 10,000/- व 90 टक्के पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना प्रत्येकी र.रु 15,000/- तसेच 12 वीच्या ज्या विदयार्थ्यांना 85 टक्के पेक्षा जास्त गुण मिळतील त्यांना प्रत्येकी र.रु 10,000/- रोख रक्कम देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार इ. 10 वी व 12 वी च्या उत्तीर्ण होणा-या विदयार्थ्यांना खालील प्रमाणे धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हददतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयांमधील इ. 10 वीचे विदयार्थी 85 ते 90 टक्के गुण संपादन करतील त्यांना प्रत्येकी र.रु 10,000/- व 90 टक्के पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना प्रत्येकी र.रु 15,000/- तसेच 12 वीचे विदयार्थ्यांना 85 टक्के पेक्षा जास्त गुण मिळतील त्यांना प्रत्येकी र.रु 10,000/- बक्षीस रक्कम अदा केली जाईल.**

त्याअनुषंगाने सदरची योजना राबविणे हा धारेणात्मक निर्णय असलेने धोरण निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.मंदाकिनी ठाकरे - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - माध्यमिक विद्यालयामार्फत ९० % व त्या पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले विदयार्थांना १,००,०००/- (एक लाख रुपये) बक्षिस देणेत यावे, मागील वर्षी सेक्टर २२ मधील माध्यमिक विदयालयातील विदयार्थी कुमार ओंकार बालाजी भंडारे हया विदयार्थ्यास ९०.२० % गुण मिळालेले होते त्याही विदयार्थ्यास एक लाखाचे बक्षिस देणेस मान्यता देणेत यावी.
मा.दत्तात्रय साने - मा.महापौर साहेब, मा.तानाजी खाडे यांनी मांडलेल्या उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.मंगलाताई कदम - मा.महापौर साहेब इंग्रजी माध्यमाच्या शाळांचाही यात समावेश करण्यात यावा. पिंपरी चिंचवड शहरात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुद्धा जास्त आहेत.

मा.अति.आयुक्त - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, सगळ्या खाजगी शाळा आहेत. सर्व माध्यमांच्या शाळा यात घेतल्या आहेत.

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ६०७ | विषय क्रमांक- १० |
| दिनांक- २०/११/२०१४ | विभाग- मा.आयुक्त |

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.माध्य/शि/३/कावि/२०१/२०१४ दि.१४/११/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिपंरी चिचंवड मनपा हददतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयांमधील इ. 10 वी 12 वीच्या विदयार्थ्यांना बक्षीस रक्क्कम देणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र. 7233 दि. 08/7/2014 अन्वये खाजगी शाळांमधील जे विदयार्थी 85 ते 90 टक्के गुण संपादन करतील त्यांना प्रत्येकी र.रु.10,000/- व 90 टक्के पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना प्रत्येकी र.रु.15,000/- तसेच 12 वीच्या ज्या विदयार्थ्यांना 85 टक्के पेक्षा जास्त गुण मिळतील त्यांना प्रत्येकी र.रु.10,000/- रोख रक्कम देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार इ. 10 वी व 12 वी च्या उत्तीर्ण होणा-या विदयार्थ्यांना खालील प्रमाणे धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हददतील खाजगी मान्यताप्राप्त विदयालयांमधील इ.10 वीचे विदयार्थी 85 ते 90 टक्के गुण संपादन करतील त्यांना प्रत्येकी र.रु 10,000/- व 90 टक्के पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विदयार्थ्यांना**

**प्रत्येकी र.रु 15,000/- तसेच 12 वीचे विदयार्थ्यांना 85 टक्के पेक्षा जास्त गुण मिळतील त्यांना प्रत्येकी र.रु 10,000/- बक्षीस रक्कम अदा केली जाईल.**

त्याअनुषंगाने सदरची योजना राबविणे हा धारेणात्मक निर्णय असलेने धोरण निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच माध्यमिक विद्यालयामार्फत ९० % व त्या पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले विदयार्थांना १,००,०००/- (एक लाख रुपये) बक्षिस देणेत यावे, मागील वर्षी सेक्टर २२ मधील माध्यमिक विदयालयातील विदयार्थी कुमार ओंकार बालाजी भंडारे हया विदयार्थ्यास ९०.२०% गुण मिळालेले होते त्याही विदयार्थ्यास एक लाखाचे बक्षिस देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.महापौर -सर्वांचे आभार मानून ही सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/१०/कावि/०३/१४
दिनांक - ०८/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.